

लाडक्या बहिणींना लखपती दीदी बनवणार ... (पान ५ वर)

दैनिक

# दिव्य वतन

जनसामान्यांचा बुलंद आवाज

नागपूर, अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, वर्धा, यवतमाळ, अकोला, वाशीम, बुलडाणा, नांदेड, हिंगोली, परभणी, लातूर, धाराशिव, अहिल्यानगर, छ. संभाजीनगर, बीड, जालना, नंदुरबार, धुळे, नाशिक



मोहम्मद शमीला निवडणूक आयोगाची नोटीस... (पान ७ वर)

RNI Number MAHBIL/२५/A०७८१ E-mail : divyawatan@gmail.com मंगळवार दिनांक ६ जानेवारी २०२६ अंक : १५३ वा वर्ष : २ रे, मूल्य : ३ रुपये, पृष्ठे : ८


## महत्त्वाचे...

### परळी धनुभाऊंना दिली, मी माळाकोळी सांभाळेन:पंकजा मुंडे



परळी - मी परळी धनंजय मुंडे यांना देऊन टाकली. आता ते परळी सांभाळतात आणि मी माळाकोळी सांभाळेन, असे विधान भाजप नेत्या तथा राज्याच्या कॅबिनेट पंकजा मुंडे यांनी सोमवारी केले आहे. परळी विधानसभा मतदारसंघ हा पंकजा यांचा होता. पण सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या धनंजय मुंडे यांनी तो ताब्यात घेतला. त्यानंतर पंकजा यांनी हा मतदारसंघ ताब्यात घेण्याचे सातत्याने प्रयत्न केले. पण आता त्यांनी चक्क परळी धनंजय मुंडेंना देऊन टाकल्याचे सूतोवाच केल्याने त्यांच्या विधानाची खमंग चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. बीड जिल्ह्यातील परळी तालुका हा मुंडे कुटुंबीयांचा राजकीय गड म्हणून ओळखला जातो. भाजपचे दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे यांनी येथूनच आपल्या राजकारणाची सुरुवात केली. त्यांच्यानंतर पंकजा मुंडे यांनी या मतदारसंघाचे विधानसभेत प्रतिनिधित्व केले. पण 2019 च्या विधानसभा निवडणुकीत पंकजा मुंडेंचा पराभव झाला आणि हा मतदारसंघ धनंजय मुंडे यांच्याकडे आला. त्यानंतर पंकजा यांनी हा मतदारसंघ ताब्यात घेण्याचा अतोनात प्रयत्न केला. त्यांनी वेळोवेळी आपल्या मनातील सल बोलूनही दाखवली. पण आता राज्याच्या राजकारणातील बदलत्या स्थितीत त्यांनी परळी धनंजय मुंडे यांना देऊन टाकल्याचे विधान केले आहे.

### एमआयएम पक्षाची मान्यता रद्द करा!



देशातील राजकीय वातावरण आधीच तापलेले असताना भाजप नेत्या नवनीत राणा आणि एमआयएम अध्यक्ष असदुद्दीन ओवेसी यांच्यातील वादाने नवे वळण घेतले आहे. काही दिवसांपूर्वी नवनीत राणा यांनी एका मौलानाच्या वक्तव्याचा संदर्भ देत हिंदूंना उद्देशून केलेले आवाहन मोठ्या प्रमाणावर चर्चेत आले. जर ते 19 मुलं जन्माला घालत असतील, तर आपणही किमान चार मुलं जन्माला घातली पाहिजेत, असे वक्तव्य त्यांनी केले होते. या विधानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर झपाट्याने व्हायरल झाला आणि त्यावरून देशभरात तीव्र प्रतिक्रिया उमटू लागल्या. या वक्तव्याने लोकसंख्या, धर्म आणि राजकारण यांचा संगम असलेला वाद पुन्हा एकदा केंद्रस्थानी आणला.

नवनीत राणांच्या या वक्तव्यावर एमआयएमचे अध्यक्ष असदुद्दीन ओवैसी यांनी अमरावतीतील जाहीर सभेत जोरदार पलटवार केला. त्यांनी उपरोधिक शैलीत नवनीत राणांना डिवचत, तुम्ही चार नाही, तर आठ मुलं जन्माला घाला, आम्हाला त्याचं काहीही देणंघेणं नाही, असे म्हटले. मात्र, ओवैसी यांचा रोख केवळ विधानावर नव्हता, तर त्या मागील राजकीय हेतूंवर होता. अशा प्रकारच्या वक्तव्यांमुळे देशातील लोकांचे लक्ष महागाई, बेरोजगारी, शिक्षण आणि आरोग्य यांसारख्या मूलभूत प्रश्नांवरून हटवले जात आहे,

# बुलढाणा-संभाजीनगर महामार्गावर भीषण अपघात

## शिवशाही बस-दुचाकीच्या धडकेत 3 तरुणांचा मृत्यू, धाड गावावर शोककळा

दिव्य वतन /वृत्तसेवा



मुंबई- रस्ते महामार्गावरील अपघातांचे सत्र थांबण्याचे नाव घेत नसून, बुलढाणा-छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील धाड गावाजवळ एसटी बस आणि दुचाकीच्या भीषण अपघातात तीन तरुणांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. बस आणि दुचाकीची समोरासमोर जोरदार धडक झाल्याने हा भीषण अपघात घडला, ज्यामध्ये दुचाकीवरील तिन्ही युवकांचा जागीच प्राण गेला. घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी तातडीने धाव घेत रुग्णवाहिकेला पाचारण केले आणि पोलिसांना माहिती दिली, मात्र दुर्दैवाने जखमींना रुग्णालयात नेण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला होता. या घटनेमुळे परिसरात मोठी शोककळा पसरली असून पोलिस प्रशासनाकडून पुढील तपास केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, छत्रपती संभाजीनगरकडून बुलढाण्याकडे जाणाऱ्या एका शिवशाही बसला धाड गावाजवळ भरधाव दुचाकीने दिलेल्या जोरदार धडकेत भीषण अपघात झाला.

या अपघातात दुचाकीवरील तिन्ही तरुणांचा जागीच मृत्यू झाला आहे. धडक इतकी भीषण होती की, स्थानिकांनी तातडीने मदतकार्य सुरू करून रुग्णवाहिकेला पाचारण केले, तरीही या तरुणांचे प्राण वाचू शकले नाहीत. या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली असून नागरिकांनी अपघातस्थळी मोठी गर्दी केली होती.

### टॅक्सी उलटल्याने 10 प्रवासी जखमी

**बुलढाणा जिल्ह्यातील नांदुरा-बुऱ्हाणपूर मार्गावर एका भरधाव वडाप टॅक्सीचा भीषण अपघात झाला असून, टॅक्सी रस्त्यालगतच्या खड्ड्यात उलटल्याने त्यातील 10 प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. या अपघातातील सर्व जखमींना तातडीने उपचारासाठी खामगाव येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेमुळे नांदुरा-बुऱ्हाणपूर मार्गावरील वाहतूक काही काळ पूर्णपणे ठप्प झाली असून, माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले आहे.**

या अपघातात मृत्युमुखी पडलेले तिन्ही युवक बुलढाणा जिल्ह्यातील ढाल सावंगी येथील रहिवासी असून कैलास दांडगे, रवी चंदनशिव आणि अंकुश पाडळे अशी त्यांची नावे आहेत. विशेष म्हणजे हे तिन्ही तरुण 20 वर्षांखालील वयाचे होते, ज्यामुळे ढाल सावंगी गावावर शोककळा पसरली आहे. या भीषण अपघातामुळे महामार्गावरील वाहतूक काही काळासाठी पूर्णपणे ठप्प झाली होती, मात्र पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून परिस्थितीवर नियंत्रण मिळवले आणि वाहतूक पूर्ववत केली.

## प्रस्ताव आल्यास त्यांनाही सोबत घेऊ:सोलापुरात अजित पवारांच्या राष्ट्रवादीच्या युतीवर धैर्यशील मोहिते पाटलांचे विधान, चर्चेला उधाण

दिव्य वतन /वृत्तसेवा



सोलापूर- जिल्ह्यातील अकलूज नगरपालिकेच्या विजयानंतर 'घायल हूँ इसलिये घातक हूँ' या 'धुरंदर' चित्रपटातील डायलॉगने भाजपवर निशाणा साधणारे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्यावर आता आगामी महापालिका निवडणुकांची महत्त्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. या नव्या जबाबदारीनंतर सोलापुरात प्रथमच प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना त्यांनी अजित पवार यांच्या राष्ट्रवादीसोबतच्या संभाव्य आघाडीबाबत आपली भूमिका स्पष्ट केली. पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्याच्या पार्श्वभूमीवर राज्यभर शरद पवार आणि अजित पवार यांच्या पुनर्मिलनाची चर्चा रंगली असतानाच, मोहिते पाटील यांनी सोलापूरच्या संदर्भात केलेल्या या भाष्यामुळे राजकीय वर्तुळाचे लक्ष वेधले गेले आहे.

महानगरपालिका निवडणुकीसाठी खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्यावर महत्त्वाची जबाबदारी सोपवली असून, त्यासोबतच 'मिशन सोलापूर महापालिका' अधिकृतपणे सुरू झाले आहे. यावेळी प्रसारमाध्यमांशी बोलताना मोहिते पाटील यांनी स्पष्ट केले .

## ड्रग्स प्रकरणातील आरोपी नगराध्यक्ष:आता तुळजाभवानीचा प्रसाद म्हणून ड्रग्सची पुडी देतील, तानाजी सावंतांचा भाजपवर हल्लाबोल

दिव्य वतन /वृत्तसेवा

तुळजापूर- काही महिन्यांपूर्वी ड्रग्सचे प्रकरण चांगलेच गाजले होते. यावरून विरोधकांनी भाजपसह महायुतीवर चांगलीच टीका केली होती. आता या ड्रग्स प्रकरणातील आरोपीला नगराध्यक्ष केल्यावरून शिवसेना शिंदे गटाचे आमदार तानाजी सावंत यांनी भाजपवर खोचक टीका केली आहे. ड्रग्स प्रकरणातील आरोपीला नगराध्यक्ष केले आहे, त्यामुळे तुळजाभवानीचा प्रसाद म्हणून ते आता ड्रग्सची पुडीही देतील, असा टोला सावंत यांनी भाजप आमदार राणाजगजितसिंह पाटील यांना लगावला आहे.

तुळजापूर ड्रग्स प्रकरणातील जामिनावर सुटलेले आरोपी विनोद गंगणे हे भाजपच्या तिकिटावर नगराध्यक्ष म्हणून निवडून आले आहेत. हाच मुद्दा धरत तानाजी सावंत यांनी भाजपच्या आमदारांवर टीका केली आहे. तसेच राणाजगजितसिंह पाटील यांना तुळजाभवानी मंदिराचा गाभारा तोडफोड प्रकरणी दोषी धरत सावंत यांनी त्यांच्यावरही जोरदार निशाणा साधला आहे.



तानाजी सावंत म्हणाले, तुळजाभवानी देवीचा गाभारा एक शक्तीपीठ आहे.

त्याचे पावित्र्य आपण राखायला हेव. झक मारायची तर बाहेर हात लावायचा, गाभाऱ्याचे पावित्र्य कशाला भंग करतो, असे म्हणत सावंत यांनी राणाजगजितसिंह पाटील यांच्यावर सडकून टीका केली. दरम्यान, आगामी जिल्हा नगरपरिषदेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आमदार तानाजी सावंत यांनी धाराशिव जिल्ह्यातील ढोकी येथे शिवसेना शिंदे गटाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा मेळावा घेतला. त्या मेळाव्यात बोलताना तानाजी सावंत यांनी तुळजापूर ड्रग्स प्रकरणावरून तसेच मंदिर तोडफोड प्रकरणावरून भाजपवर जोरदार हल्लाबोल केला आहे.

# पक्षाचा आदेश आहे, उमेदवारी मागे घ्या!

## शिवसेना ठाकरे गटाच्या जिल्हाप्रमुखांचाच उमेदवाराला फोन

दिव्य वतन /वृत्तसेवा



मुंबई- सध्या महापालिकेच्या निवडणुकीत बिनविरोध निवडणुका पार पाडण्याचा नवा ट्रेंड सुरू झाला असल्याचे पाहायला मिळत आहे. कल्याण डोंबिवलीत भाजप तसेच शिवसेना शिंदे गटाकडून अनेक उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. या पार्श्वभूमीवर विरोधी उमेदवारांना दमदाटी करून अर्ज मागे घेण्यास भाग पाडले जात असल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात आहे. अशातच आता शिवसेना ठाकरे गटाच्या जिल्हाप्रमुखांवर आपल्याच उमेदवाराला अर्ज मागे घ्यायला लावला असल्याचा आरोप केला जात आहे.कल्याण डोंबिवली महापालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना ठाकरे गटाच्या उमेदवाराने स्वतःच्याच पक्षाच्या जिल्हाप्रमुखांवर गंभीर आरोप केला आहे. जिल्हाप्रमुखांनीच अर्ज मागे घ्यायला लावले, असा आरोप उमेदवाराने केला आहे. या संदर्भात एक ऑडिओ क्लिप देखील व्हायरल झाली आहे. (दिव्य मराठी या ऑडिओ क्लिपची पुष्टी करत नाही.)

कल्याण डोंबिवली महापालिकेच्या प्रभाग क्रमांक 22 मधील शिवसेना ठाकरे गटाच्या उमेदवार वैशाली पोटे यांनी जिल्हाप्रमुख तात्या माने यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. तात्या माने यांची एक ऑडिओ क्लिप व्हायरल झाली आहे. ही क्लिप वैशाली पोटे यांनी पोस्ट केल्याची चर्चा आहे. व्हायरल क्लिपमधील संभाषणात तात्या माने निवडणुकीतून माघार घ्या, असे सांगत आहेत.व्हायरल झालेल्या या ऑडिओ क्लिपमध्ये असे ऐकू येते की, पक्षाचा आदेश आहे, उमेदवारी मागे घ्या. तुम्ही वरुण सरदेसाई यांच्याशी बोलून घ्या. तसेच पुढे असे म्हटले की, वरून आदेश येतात, तेव्हा आपल्याला काही गोष्टी कराव्या लागतात. मी आता काय करू शकतो. पक्षाची वरच्या पातळीवर काय गणिते ठरतात, आपल्याला काय माहिती. मी काय करू शकतो, असे तात्या माने वैशाली पोटे यांना सांगत असल्याचा दावा करण्यात येत आहे.दरम्यान, ही ऑडिओ क्लिप व्हायरल झाल्यानंतर कल्याण-डोंबिवलीमध्ये शिवसेना ठाकरे गटात मोठी खळबळ उडाली आहे.

## मुंबईत धमक्यांची मालिका सुरूच:वांद्रे कोर्टानंतर आता टाटा मेमोरियलला धमकीचा ईमेल

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई- गत काही दिवसांपासून मुंबईतील वेगवेगळ्या आस्थापनांना सातत्याने बॉम्ब ठेवल्याच्या धमक्या येत आहेत. त्यात आता टाटा मेमोरियल हॉस्पिटलची भर पडली आहे. टाटा मेमोरियल हॉस्पिटलच्या परिसरात बॉम्ब ठेवल्याचा इशारा देणारा एक ईमेल आज सकाळी रुग्णालय प्रशासनाला प्राप्त झाला. त्यानंतर परेल पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन तपासणी सुरू केली. हा घटनाक्रम पाहून इथे उपचारासाठी आलेल्या रुग्णांसह परिसरात मोठी घबराट पसरली होती.



यासंबंधीच्या माहितीनुसार, मुंबईतील टाटा मेमोरियल रुग्णालयाला सोमवारी सकाळी धमकीचा ईमेल प्राप्त झाला. या ईमेलमध्ये रुग्णालयाच्या परिसरात बॉम्ब ठेवण्यात आल्याचा दावा करण्यात आला होता. हा ईमेल मिळताच रुग्णालय प्रशासनाने तातडीने मुंबई पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर मुंबई पोलिस व बॉम्बनाशक पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी संपूर्ण इमारत व परिसराचा ताबा घेत बॉम्बची शोधाशोध सुरू केली. पण कोणतीही संशयास्पद वस्तू हाती लागली नाही. त्यामुळे बॉम्ब ठेवल्याचा इशारा केवळ अफवा ठरला आहे.पोलिसांकडून तपास सुरू पोलिसांसह रुग्णालयाचे अधिकारीही ईमेल पाठवणाऱ्याचा व त्यामागील हेतूचा तपास करत आहेत. मुंबई पोलिसांनी जारी केलेल्या निवेदनानुसार, बॉम्बच्या धमकीनंतर सुरक्षा यंत्रणांना हाय अलर्टवर ठेवण्यात आले होते. घटनेची माहिती मिळताच बॉम्ब स्क्वॉड व इतर सुरक्षा यूनिट्ससह मुंबई पोलिसांच्या अनेक पथकांनी घटनास्थळी धाव घेतली.'

# लातूरमधून विलासरावांच्या आठवणी पुसल्या जातील- रवींद्र चव्हाण

## करारा जवाब मिलेगा!; चव्हाणांच्या विधानावर काँग्रेसचा संताप

दिव्य वतन /वृत्तसेवा

भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी लातूरमध्ये केलेल्या एका वक्तव्यावरून काँग्रेस नेते व कार्यकर्त्यांनी संताप व्यक्त केला आहे. लातूरच्या प्रचार सभेत बोलताना चव्हाण म्हणाले, भाजप कार्यकर्त्यांचा उत्साह पाहता लातूरमधून विलासराव देशमुखांच्या आठवणी पसुल्या जातील यात शंका नाही. त्यांच्या या वक्तव्याचा काँग्रेसकडून जोरदार निषेध केला जात आहे.

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी ट्विट करत रवींद्र चव्हाण यांच्या वक्तव्याचा जाहीर निषेध केला आहे. सपकाळ म्हणाले, स्व. विलासराव देशमुख साहेबांच्या आठवणी लातूर जिल्ह्यातून पुसू शकणारा अजून कोणी निर्माण नाही झाला. अनेक जण इच्छा बाळगून आलेत आणि स्वाभिमानी लातूरकरांनी त्यांना त्यांची जागा दाखवून दिली आहे.

पुढे बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, विलासराव देशमुख यांनी लातूर जिल्ह्याला राष्ट्रीय पातळीवर ओळख मिळवून दिली, त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य लातूरच्या विकासासाठी समर्पित केले. आज त्यांच्याबद्दल हे सत्तेचा माज असलेले भाजप नेते लातूरात येऊन बरळून जातात की साहेबांच्या आठवणी पुसल्या गेल्यात. त्यांना काय समजणार विलासराव देशमुख साहेबांचे लातूरशी असलेले नाते. लातूरच्या कर्तुत्वसंपन्न सुपुत्राचा अपमान लातूरकर कधीही सहन करणार नाही, भाजपवाल्यांनो याद राखा, करारा जवाब मिलेगा, अशा शब्दांत सपकाळ यांनी इशारा दिला आहे.

दरम्यान, मेळावा झाल्यानंतर रवींद्र चव्हाण यांनी माध्यमांशी बोलणे टाळले आहे. त्यामुळे विलासराव देशमुखांवर त्यांनी केलेल्या विधानावर अधिक खुलासा झाला नाही. परंतु, त्यांनी केलेल्या या विधानामुळे काँग्रेस कार्यकर्त्यांसह लातूरकरांच्या देखील भावना दुखावल्या गेल्या आहेत. यावर आता राजकीय वर्तुळात काय प्रतिक्रिया उमटतात याकडे सर्वांचे लक्ष असणार आहे.





## महत्त्वाचे...

### स्काऊट गाइडने राष्ट्र भक्ती, राष्ट्र प्रेमाची भावना

यवतमाळ : भारत स्काऊट गाईड कार्यालय व शिक्षण विभाग पंचायत समिती यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २ जानेवारीला तालुकास्तरीय कब बुलबुल उत्सवाचे आयोजन जिल्हा परिषद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय गोधनी रोड व नेहरू क्रीडा संकुल यवतमाळ येथे करण्यात आले होते. या बुलबुल उत्सवाला तालुक्यातून प्रचंड प्रतिसाद मिळाला. तालुक्यातील तब्बल १९८ विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग नोंदविला. या कब बुलबुल उत्सवाचे उद्घाटन यवतमाळ विधानसभा क्षेत्राचे आमदार बाळासाहेब मांगूळकर यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डायटचे प्राचार्य डॉ. रमेश राऊत यांची उपस्थिती होती. तर प्रमुख अतिथी म्हणून श्रीमती वंदना नाईक उपशिक्षणाधिकारी माध्यमिक जि प यवतमाळ, उपशिक्षणाधिकारी नीता गावंडे, गटशिक्षणाधिकारी पोपेश्वर भोयर, विस्तार अधिकारी प्रणिता गाढवे, विस्तार अधिकारी विद्या वैद्य, दीपिका गुल्हाने, सुरेश राठोड, मुख्याध्यापक साहेबराव पवार, स्काऊट गाईड जिल्हा संघटक मनीषा तराळे आदींची उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी स्काऊट गाईडचे जनक लॉर्ड बेडन पॉवेल यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला प्रारंभ करण्यात आला.

### बालविवाहमुक्त महाराष्ट्रासाठी निर्धार करुया



वाशीम लिंग गुणोत्तर हे समाजाच्या संवेदनशीलतेचे व प्रगतीचे महत्त्वाचे द्योतक आहे. मुलींचा जन्म, शिक्षण, आरोग्य आणि सन्मान याबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाल्याशिवाय लिंग गुणोत्तरात अपेक्षित वाढ होणार नाही. त्यामुळे बेटी बचाव बेटी पढाव अभियानाच्या माध्यमातून प्रत्येक कुटुंबाने व समाजाने मुलींच्या संरक्षणासाठी व सक्षमीकरणासाठी पुढाकार घ्यावा. बालविवाह, लिंगभेद व भेदभावाच्या मानसिकतेला आळा घालून मुलींना समान संधी देणे ही काळाची गरज आहे. प्रशासनासोबतच नागरिकांनीही सक्रिय सहभाग घेऊन लिंग गुणोत्तर वाढविण्यासाठी एकत्रित प्रयत्न करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी येथे केले. बेटी बचाव बेटी पढाव या केंद्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी अभियानाअंतर्गत बालविवाह मुक्त महाराष्ट्र 'आपला संकल्प' या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने भव्य जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीला जिल्हाधिकारी कुंभेजकर यांनी हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ केला. यावेळी जिल्हाधिकारी बोलत होते. या प्रसंगी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव व्ही. एस. चौखंडे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी उत्तम शिंदे, परिविक्षाधीन अधिकारी गणेश ठाकरे, गजानन पडघान, निती आयोगाच्या जिल्हा प्रकल्प प्रमुख निलिमा भोंगाडे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी भगवान ढोले, स्वप्नील चव्हाण, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अविनाश पुरी यांची उपस्थिती होती. बालविवाहास प्रतिबंध करणे, मुलींच्या शिक्षणाला चालना देणे तसेच लिंग गुणोत्तर वाढविण्यासाठी समाजात व्यापक जनजागृती निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

# जगात कुठेही असाल, तिथून करा सौर पॅनलची स्वच्छता

## प्राध्यापकाने विकसित केली स्वदेशी 8 किलोवॅट सौर पॅनल प्रणाली

**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी**

नागपुर - सौर पॅनलची स्वच्छता मोठे जिकीरीचे व किचकट काम आहे. आता सौर पॅनल स्वच्छ करणे सोपे झाले. तुम्ही ऑफिसला, बाहेर गेले असाल वा देशात कुठेही असाल आणि वायफायशी जुळलेले असले तर तिथून घरच्या सौर पॅनलची स्वच्छता करू शकाल. एस. बी. जैन इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंगमधील सहायक प्राध्यापक राहुल पेठे व त्यांचे सहकारी रोहित शहाणे, वृषभ गिलारकर आणि हर्ष सूर्यवंशी यांनी ८ किलोवॅटची प्रगत सौर पॅनलसाफसफाई प्रणाली विकसित केली आहे. या प्रणालीच्या प्रत्यक्ष वापराची चाचणी यशस्वीरीत्या पूर्ण केली आहे.

विश्वसनीय कार्यक्षमता, प्रभावी डिटर्जंट-आधारित स्वच्छता आणि सातत्यपूर्ण परिचालन कार्यक्षमता प्रदर्शित केली.

सर्व कार्यात्मक आणि तांत्रिक मापदंडांनी निर्धारित मानकांची पूर्तता केली आहे. सौर पॅनलवर फोटोव्होल्टेइक पॅनलवर धूळ व घाण साचते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात ऊर्जेची हानी होऊ शकते. धूळयुक्त व उच्च-तापमानात वापरण्यासाठी डिझाइन केलेली प्रणाली, कमी ऊर्जा वापरून नियमित, सुरक्षित आणि कार्यक्षम स्वच्छता करते.

मानवी श्रम कमी करणे, देखभालीचा खर्च कमी करणे आणि सौर ऊर्जा प्रकल्पाची एकूण कार्यक्षमता सुधारणे हा यामागचा उद्देश आहे असे पेठे यांनी सांगितले. पॅनल

**स्वच्छतेसाठी 6 किलोवॅटचे 12 स्प्रिंकलर**

**सौर पॅनेल स्वच्छतेसाठी ६ किलो वॅटचे १२ स्प्रिंकलर लागेल. स्वच्छता करता यावी यासाठी वरून खाली अशी सौर पॅनलची रचना केलेली असते. वरच्या आणि खालच्या पॅनलच्या मध्ये स्वच्छतेसाठी जागा सोडलेली असते. या जागेत दोन्ही पॅनलच्या मध्ये क्लिनिंगसाठी सोलोनाइट वॉल लावण्यात येते. त्यावर १२ स्पिंस्क्रलर लावलेले असतात. पॅनेलच्या स्वच्छतेसाठी पहिले ३० सेकंदासाठी पाणी मारून ओले करण्यात येते. नंतर अर्ध्या सेकंदासाठी डिटर्जंट लिक्विड फोम सोडले जाते. नंतर १ मिनिटांसाठी पाणी येऊन स्वच्छ करण्यात येईल.**

स्वच्छतेसाठी मोबाइलमध्ये फ्री ॲप पॅनेल स्वच्छतेसाठी मोबाइलमध्ये फ्री ॲप दिले आहे.

त्याद्वारे सौर पॅनेलची स्वच्छता केली जाते. वायफायशी जोडलेले असाल तर कुठूनही घरावरील सौर पॅनेलची स्वच्छता करता येते. या ॲपमध्ये फक्त डिटर्जंट, फक्त पाणी आणि संपूर्ण स्वच्छता असे पर्याय दिले आहे. वायफाय सिस्टिम कनेक्टेड राहण्यासाठी हार्डवेअर तयार केले आहे. त्यात एक सॉफ्टवेअर प्रोग्रामिंग कोड दिले आहे. ते वायफायसोबत कनेक्ट राहिल. वायफाय सुरू असेल तर ५



होल्टचा सप्लाय लागतो. मोटर दीड मिनिटांसाठी सुरू असते. सौर पॅनल स्वच्छ झाल्यानंतर स्प्रिंकलर ऑटोमॅटिक बंद होते, असे पेठे यांनी सांगितले.

# अखिल भारतीय ग्राहक पंचायतचा एकदिवसीय अभ्यास वर्ग उत्साहात संपन्न

### कार्यकर्तेच संघटनेचा खरा आधारस्तंभ – नितीन काकडे

**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी**

नागपूर : कोणत्याही संघटनेची खरी ओळख तिच्या कार्यकर्त्यांमधूनच समाजासमोर येत असते. कार्यकर्ता हा संघटनेचा आरसा असून संघटनेची प्रतिमा, विचारधारा व कार्यपद्धती समाजापर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वाचे कार्य तो करीत असतो. त्यामुळे संघटनेची सकारात्मक प्रतिमा जोपासण्याची जबाबदारी प्रत्येक कार्यकर्त्याची आहे, असे प्रतिपादन अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे पश्चिम क्षेत्र संघटन मंत्री नितीन काकडे यांनी केले.

अखिल भारतीय ग्राहक पंचायती नागपूर जिल्हा कार्यकर्ता अभ्यास वर्ग कळमेश्वर येथील ईरिस शेतकरी प्रशिक्षण सभागृहात रविवारी दि. ४ जानेवारी रोजी उत्साहात पार पडला. या अभ्यास वर्गाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विदर्भ प्रांताध्यक्ष डॉ. नारायण मेहरे होते. नितीन काकडे पुढे म्हणाले की, शोषणमुक्त समाज निर्मितीचे ग्राहक पंचायतीचे उद्दिष्ट कार्यकर्त्यांच्या निष्ठावंत कार्यातूनच पूर्णत्वास जाऊ शकते. त्यासाठी ही चळवळ तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे कार्य परिश्रमपूर्वक करावे लागेल. विदर्भातील कार्यकर्ते या दृष्टीने सक्रिय भूमिका बजावत असून ही बाब निश्चितच समाधानकारक असल्याचे मत व्यक्त केले आहे.

अध्यक्षीय भाषणात डॉ. नारायण मेहरे यांनी ग्रामीण भागातील ग्राहकांना त्यांच्या हक्कांबाबत जागृत करण्याची गरज अधोरेखित केली. तर केंद्र प्रमुख सुनील कोंडे यांनी शेतकरी ग्राहकांच्या प्रश्नांना अग्रक्रम देऊन त्यांचे निराकरण करण्याचे आवाहन केले. यावेळी प्रांत संघटक अभय खेडकर व प्रांत सचिव डॉ. चारुदत्त चौधरी यांनीही मार्गदर्शनपर भाषणे केली. कार्यक्रमास मंचावर नागपूर जिल्हाध्यक्ष संजय साळवे, जिल्हा सचिव प्रभाकर शिवणकर, नागपूर महानगर अध्यक्ष शरद जिचकार, प्रांत उपाध्यक्ष श्रीपाद भट्टलवार सहसचिव विलास ठोसर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष संजय साळवे यांनी, सुत्रसंचालन जिल्हा उपाध्यक्ष मधुकर पोटे यांनी केले तर राजेंद्र धिवारे यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा सचिव प्रभाकर शिवणकर, प्रकाश क्षीरसागर, अनिल मेहरे, गुणवंत आत्राम, विनोद सरपे, भूपेश गुल्हाने तसेच जिल्हा व महानगरातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोलाचे सहकार्य केले.या अभ्यास वर्गात नागपूर जिल्ह्यासह विविध तालुक्यांतील ग्राहक पंचायतीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. दिवसभर चाललेल्या या वर्गात ग्राहक संरक्षण कायदा व माहिती अधिकार कायदा या विषयावर जिल्हा ग्राहक आयोगाचे माजी सदस्य अविनाश प्रभुणे, पर्यावरण विषयावर डॉ. चारुदत्त चौधरी तसेच शेतकरी ग्राहकांच्या समस्या व उपाययोजना यावर सुनील कोंडे यांनी सखोल मार्गदर्शन केले.अभ्यास वर्गामुळे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून आगामी काळात ग्राहक चळवळ अधिक प्रभावीपणे राबवण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला. अशा अभ्यासपूर्ण उपक्रमांचे सातत्याने आयोजन व्हावे, अशी अपेक्षा समारोपावेळी व्यक्त करण्यात आली.

# रक्षा लेखा विभागाच्या सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचार्यांचे स्नेह सम्मेलन उत्साहात

**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी**



नागपुर व जवळील परिसरात राहणाऱ्या रक्षा लेखा विभागाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्या सहकुटुंबातील स्नेह सम्मेलन आयोजित करण्यात आले होते. कर्यक्रमाचा शुभारंभ सर्वात वयोवृद्ध सेवानिवृत्त डी एन जोशी यांच्या शुभहस्ते दिपप्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली.

याप्रसंगी प्रमोद खिरे, सेवानिवृत्त सहायक निदेशक (रा.भा) यांनी प्रस्तावना मांडली व आयोजनाचे उद्दिष्ट्येबद्दल सांगितले. लक्ष्मण लिखार, सेवानिवृत्त रक्षा लेखा संयुक्त नियंत्रक, यांनी आयोजन बद्दल समाधान व्यक्त केले, ते म्हणाले कि असे आयोजन झाल्याने एकमेकांच्या भेटी होतात व एकटेपणा ची भावना दूर होते. सेवानिवृत्त सदस्यांच्या सुविधेसाठी जीवन प्रमाण एप डाऊनलोड करून जीवन प्रमाणपत्र प्रस्तुत करण्याचे प्रात्यक्षिक करण्यात आले. यामुळे कार्यालयात व बैंकेत न जाता मोबाईल द्वारे ही प्रक्रिया सहज करता येते. अन्य उपलब्ध सेवांची पण माहीती देण्यात आली. ७५ वर्ष झालेल्या सदस्यांचे शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आले. इतरही सर्व सदस्यांना दुपट्टे देऊन सत्कार केले. भारतीय रक्षा लेखा सेवेचे सेवानिवृत्त अधिकारी एस.टी.रणदिवे, आनंद मेश्राम, एन.जी.चोखंदरे, बी.जी.थूल, बी.एम.हकीम, विनायक वर्तक, विकास मोहरीर व इतरही अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. अशोक पझारे, किशन भिमटे, गेंदलाल गणवीर, पी.एम.देव, दिलिप बागेश्वर यांचे सहकार्य लाभले. जितेंद्र थुलकर यांनी संचालन केले तर सुधीर बरडे यांनी आभार मानले.

# राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस स्पर्धेत भद्रावतीतील आरुष रवी गेडाम यांचे भव्य यश

**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधीसेवा**

नागपूर: जैन कलार समाज भवन रेशीमबाग चौक, उमरेड रोड येथे नुकतीच राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस स्पर्धा यशस्वीपणे पार पडली. यास्पर्धेत भद्रावती (चंद्रपूर) येथील आरुष रवी गेडाम यांनी अवघ्या ६ मिनिटे ४१ सेकंदात १०० पैकी १०० प्रश्न अचूक सोडवत चॅम्पियन होण्याचा मान मिळवला. या स्पर्धेत देशभरातील विविध राज्यांमधून विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. छत्तीसगड, गोवा, पुणे, भंडारा, नागपूर, भुसावळ, यवतमाळ, एरंडोल, चंद्रपूर, भद्रावती, आग्रा, दिल्ली,



जबलपूर, मुंबई, पालघर तसेच मध्य प्रदेश येथील विद्यार्थ्यांनी आपल्या गणनाशक्तीची कसोटी घेतली. स्पर्धेचे उद्घाटन विशाल कोहिटे, विवेक आगसे, सफिर अहमद आणि राजेश मसुरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. स्पर्धेदरम्यान विद्यार्थ्यांची वेगवान गणनाशक्ती, अचूकता आणि एकाग्रता यांचे मूल्यमापन करण्यात आले. आरुष रवी गेडाम यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल पालक, शिक्षक आणि आयोजकांकडून त्याचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले असून, त्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या यशामुळे भद्रावती (चंद्रपूर) तसेच नागपूर शहराचे नाव राष्ट्रीय स्तरावर उजळले आहे. आयोजन अबॅकस अकादमी, नागपूर यांनी केले तर संचालन व आभार दीक्षा खानोरकर यांनी मानले.

# यंत्र इंडिया लिमिटेडच्या वृक्षारोपण उपक्रमात रोटरी क्लब ऑफ नागपूर ईशान्याचे योगदान

## 1500 हून अधिक रोपांचे दान, पर्यावरण संवर्धनाला चालना

**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी**

नागपूर : पर्यावरण संवर्धनासाठी एक उल्लेखनीय संयुक्त उपक्रम म्हणून यंत्र इंडिया लिमिटेड (माजी ऑर्डनन्स फॅक्टरी) परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत रोटरी क्लब ऑफ नागपूर ईशान्या यांनी 1500 हून अधिक रोपांचे दान यंत्र इंडिया लिमिटेडला केले असून, त्यांचे रोपण व संगोपन यंत्र इंडिया लिमिटेडतर्फे करण्यात येत आहे. हा वृक्षारोपण कार्यक्रम यंत्र इंडिया लिमिटेडच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आला होता. यामध्ये नीम, जांभूळ, पिंपळ, वड यांसारख्या पर्यावरणपूरक वृक्षांचा समावेश करण्यात आला.

रोटरी क्लब ऑफ नागपूर ईशान्याने रोपांचे दान करून या हरित मोहिमेस मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमात यंत्र इंडिया लिमिटेडचे CMD श्री आय.आर.अय्यर हे त्यांच्या पत्नी श्रीमती प्रिया अय्यर यांच्यासह उपस्थित होते. यावेळी श्री आर्या व श्रीमती रश्मी आर्या, श्री व श्रीमती गर्ग, श्रीमती सीमा गुप्ता तसेच अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रभावी संचालन (MOC) श्रीमती अर्चना सिंग यांनी केले.

पर्यावरण संवर्धनातील योगदानाबद्दल यंत्र इंडिया लिमिटेडतर्फे रोटरी क्लब ऑफ नागपूर ईशान्याच्या अध्यक्ष रोटेरियन डॉ. मनीषा राठी, मानद




सचिव रोटेरियन विनम्र खेमुका, तसेच पर्यावरण समिती अध्यक्ष रोटेरियन डॉ. स्वर गट्टानी यांना प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले. रोटरी क्लबच्या वतीने रोटेरियन देशमुख, रोटेरियन जगदीश चतुर्वेदी, अपुर्वा हेडा, अमृता गट्टानी, रोटेरियन प्रविण गोटमारे यांच्यासह अनेक सदस्य उपस्थित होते. CMD श्री अय्यर यांनी रोटरी क्लब ऑफ नागपूर ईशान्याच्या सहकार्याचे कौतुक करत भविष्यातही अशा संयुक्त सामाजिक व पर्यावरणीय उपक्रमांत सहभाग कायम राहील असे नमूद केले.

# राष्ट्रवादी काँग्रेस नागपुर जिल्हा ग्रामीण उपाध्यक्षपदी श्री.प्रशांत ठाकरे

**दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी**

सावनेर -नागपुर जिल्हा ग्रामीण अध्यक्ष मा.श्री. राजाभाऊ टाकसाळे यानी नागपुर जिल्हा ग्रामीण उपाध्यक्षपदि श्री प्रशांत भाऊराव ठाकरे यांची नियुक्ति केली. यावेळी प्रशांत ठाकरे यानी पार्टी अध्यक्ष व महाराष्ट्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री मा.श्री. अजीतदादा पवार, मा.श्री. प्रफुल भाई पटेल, प्रदेशाध्यक्ष मा.श्री.सुनीलजी तटकरे मा.श्री. छगनजी भुजबळ. यांचे आभार मानले तसेच महिला जिल्हाध्यक्ष ग्रामीण, सौ.करिष्माताई चूटे, कार्याध्यक्ष मा.श्री. श्रीकांतजी माटे, तालुका अध्यक्ष मा.श्री. सुरेंद्रजी वानखेडे, शहर अध्यक्ष श्री गोपालजी घटे, महिला पदाधिकारी सौ वैशाली ताई घटे, सौ स्मिता ठाकरे,सौ शीतल माटे, सौ कविता ताई कानफाड़े,सौ यामिनी मंडपे,सनी पारवे, आशीष माटे, रोशन वानखेडे,मोहनजी कानफाड़े, योगेश्वर वाळबुधे ,तुषार गायकवाड़,प्रा. विठ्ठलरावजी कोल्हे, शांताराम अंतूरकर, सुभाष सेंबेकर, किशोरजी कावड़कर,विजय रड़के, संजय तिडके,राहुल बांद्रे,सुभाष चिखले,हर्ष ठाकरे,राजेश पोटे,निखिल ठवकर,पंकज महाजन, अभिषेक साबळे,चेतन ठाकरे,यानी प्रशांत ठाकरे यांचे अभिनंदन केले तसेच समोरच्या वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



## महत्त्वाचे...

### मुंबईत 2 कोटी 33 लाखांची रोकड जप्त:निवडणूक भरारी पथकाची मोठी कारवाई



मुंबई : राज्यात आगामी महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आचारसंहिता लागू करण्यात आली असून, निवडणूक आयोगाची भरारी पथके सध्या अत्यंत सतर्क आहेत. मुंबईसह विविध महानगरांमध्ये संशयास्पद वाहनांची कसून तपासणी केली जात आहे. गेल्या काही दिवसांत अनेक ठिकाणी उमेदवार बिनविरोध निवडून आल्याने, त्यामागे आर्थिक आमिषे किंवा पैशांचा मोठा वापर झाल्याचे गंभीर आरोप राजकीय वर्तुळातून केले जात आहेत. यामुळे निवडणुकीच्या काळात मतदारांना प्रभावित करण्यासाठी किंवा कोणत्याही प्रकारच्या गैरप्रकारांसाठी अवैध पैशांची देवाणघेवाण होऊ नये, यासाठी प्रशासन डोळ्यात तेल घालून काम करत आहे.

याच कडक बंदोबस्ताचा भाग म्हणून मुंबईतील देवनार परिसरात निवडणूक आयोगाच्या भरारी पथकाने मोठी कारवाई केली आहे. एका संशयास्पद वाहनाची तपासणी केली असता, त्यात तब्बल 2 कोटी 33 लाख रुपयांची रोख रक्कम सापडल्याने खळबळ उडाली आहे. पथकाने ही सर्व रोकड तातडीने ताब्यात घेतली असून, ही रक्कम नेमकी कोणाची आहे आणि ती कुठे नेली जात होती, याचा सखोल तपास सुरू करण्यात आला आहे. आचारसंहितेच्या काळात इतकी मोठी रक्कम सापडल्याने पोलीस आणि निवडणूक विभागाकडून आता अधिक कडक तपासणी केली जात आहे. मुंबईतील देवनार परिसरात निवडणूक भरारी पथकाने मोठी कारवाई करत दोन व्हॅनमधून तब्बल 2 कोटी 33 लाख रुपयांची रोकड जप्त केली आहे. ही रक्कम एटीएममध्ये भरण्यासाठी नेली जात असल्याचा दावा संबंधित कर्मचाऱ्यांकडून करण्यात आला असला तरी, निवडणूक आचारसंहितेच्या पार्श्वभूमीवर आयकर विभागाकडून या पैशांची सखोल चौकशी करण्यात येत आहे. देवनार पोलिसांनी या घटनेची नोंद आपल्या स्टेशन डायरीत केली असून, ही रक्कम सध्या पोलिस कस्टडीत सुरक्षित ठेवण्यात आली आहे.

### वाहन चालवताना दक्ष राहिल्यास इतरांचे जीव धोक्यात येणार नाहीत:नसले यांचे प्रतिपादन;

मूर्तिजापूर- रस्त्यांवर सुरक्षित वाहने चालवणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. वाहन चालवताना दक्ष राहून इतरांचे जीवन आपल्यामुळे धोक्यात येऊ नये, ही भावना मनात ठेवली तर कधीही अपघात होणार नाहीत. आपल्या वाहनांची तपासणी वेळोवेळी करून रस्त्यावर वाहन चालवताना दक्ष राहणे हाच उद्देश रस्ता सुरक्षितता अभियानाच्या माध्यमातून सर्वांपर्यंत दरवर्षी पोहोचण्याचे कार्य एसटी महामंडळाच्या वतीने करण्यात येते, असे प्रतिपादन मूर्तिजापूर येथील एस. टी. आगारात रस्ता सुरक्षितता अभियानाचे उद्घाटनप्रसंगी विलास नसले यांनी केले. अभियानाचे उद्घाटन दीपक अग्रवाल यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी आगार व्यवस्थापक हेमंत चांदूरकर होते. याप्रसंगी दीपक अग्रवाल यांनी विचार व्यक्त केले. एस. टी महामंडळाच्या एकाही बसचा अपघात वर्षभरात घडला नसल्याचे व्यवस्थापक चांदूरकर यांनी सांगितले. रस्ते वाहतुकीत सुरक्षित प्रवास महत्वाचा भाग आहे. परिवहन महामंडळ हे प्रवाशांची सुरक्षित वाहतूक सेवा करते. रा. प. बसेसचे अपघात टाळण्यासाठी महामंडळाकडून नियमितपणे अपघात नियंत्रण उपाययोजना करण्यात येतात.

# शेतकऱ्यांच्या समस्या प्रलंबित; तलाठी, मंडळ अधिकाऱ्यांनी शिबिरे घ्यावीत

## तिवसा तालुक्यातील शिरजगाव मोझरीच्या शेतकऱ्यांची तहसीलदारांकडे मागणी

**दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी**

तिवसा तालुक्यातील शेतकऱ्यांना सप्टेंबर २०२२ मध्ये झालेल्या अतिवृष्टीची नुकसान भरपाई अद्याप पूर्णतः मिळालेली नाही. अनेक शेतकरी रब्बीच्या पेरणी अनुदानापासूनही वंचित आहेत.

शासनाच्या क्लिष्ट प्रक्रियेमुळे ते अडचणीत आले असून, त्यांच्या प्रलंबित समस्या सोडवण्यासाठी तलाठी आणि मंडळ अधिकाऱ्यांनी ठिकठिकाणी शिबिरे आयोजित करावीत, अशी मागणी शिरजगाव मोझरी येथील शेतकऱ्यांनी केली आहे.

सध्या शेतकरी मोठ्या विवंचनेत सापडले आहेत. काही शेतकऱ्यांना नुकसान भरपाईचे पैसे टप्प्याटप्प्याने मिळत आहेत, तर काहींना एकही टप्पा मिळालेला नाही.

अनेक शेतकऱ्यांची नावे नुकसान भरपाईच्या यादीत दिसत नाहीत. तसेच, केवायसीच्या फेऱ्यांसाठी शेतकऱ्यांना तालुक्याच्या ठिकाणी जावे लागत असल्याने त्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.

या समस्यांवर उपाय म्हणून, तालुक्यातील ग्रामपंचायतनिहाय तलाठी आणि मंडळ अधिकाऱ्यांनी संबंधित मौजातील इतर कर्मचाऱ्यांसह नियमित शिबिरे (कॅम्प) आयोजित करावीत, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

यामुळे शेतकऱ्यांचा नुकसान भरपाईबाबतचा संभ्रम दूर होऊन त्यांच्या समस्या सुटण्यास मदत होईल.

यासाठी तहसील प्रशासनाने तातडीने आपल्या कार्यालयातील तलाठी, मंडळ अधिकारी, इतर कर्मचारी आणि बँकेच्या कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन ग्रामपंचायतनिहाय शिबिर घेण्यासाठी वेळापत्रक जाहीर करावे, असेही शेतकऱ्यांनी म्हटले आहे. याबाबतचे निवेदन तहसीलदार यांना देण्यात आले आहे.

यावेळी शिवणगावचे सरपंच धर्मराज खडसे, देवेंद्र घाटोळ, विजय कुरळकर, हर्षल मेश्राम, प्रदीप वाघ, गजानन खेरडे, ॲड. विकास तूरकाने, अशोक वैद्य, किरण बनसोड, गजानन वैद्य आणि प्रशांत कांबळे यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.



## रिधोरा येथे शेतकरी संघर्ष कृति समिती शाखेची स्थापना

**दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी**

काटोल - नुकतीच शेतकरी संघर्ष कृति समिती (ब. सं ) काटोल, जि नागपूर, महा. राज्या तर्फेकाटोल जवळील रिधोरा येथे समितीच्या शाखेचा विस्तार करण्यात आला. तेथील नवयुवकांना नियुक्त्या देण्यात आल्या. यावेळी समितीचे अध्यक्ष बाबाराव वाघमारे, सचिव श्री प्रफुल्ल जोशी, सहसचिव हरिष मानकर, सदस्य श्रीमती सुवर्णा पवार, तर समितीतर्फे प्रमुख उपस्थितात डॉ सुधाकर कावळे, सौ पुष्पा सावरकर,श्री विनोद नागपुरे सौ वर्षा कुरेकर, ज्योती राऊत, श्रीमती वर्षा मोरे, या सर्वातर्फे समितीच्या रिधोरा शाखेमध्ये श्री विलास पोहकर अध्यक्षपदी, वसतराव तभाने उपाध्यक्ष, अनिल डांगोरे सचिव, साहेबराव तभाने कोष्याध्यक्ष,श्री अनिल मह्हले सहसचिव, तर सदस्यामध्ये भूषण हिवसे, रामरावजी कोठे,



बंळवतराव वाघमारे, हरिभाऊ डफर, पिंटूभाऊ राऊत, सतीश पवार, नितीन पोहकर, भूषण मोहोड, या सर्वांची सदस्य पदी निवड करण्यात आली. श्री विलास पोहकर यांनी कार्यक्रमाचे उत्तम आयोजन व नियोजन केले होते. प्रास्ताविक प्रफुल्ल जोशी यांनी केले. शेतकऱ्याच्या प्रश्नांना वाच्या फोडन्याकरिता व त्यांच्या हितासाठी कार्य करण्यासाठी उद्देशाने समितीच्या शाखेचा विस्तार करण्यात आला. नवनियुक्त पदधिकारी हे अनुभवी, कार्यक्षम व शेतकरी प्रश्नांची जान असलेले असून त्यांनी यापूर्वीही विविध सामाजिक व शेतकरी चळवळीत सक्रिय सहभाग घेतला आहे. कर्जमाफी, हमीभाव, विज, पाणी, पीकविमा, नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे नुकसान आदी प्रश्नावर ठोस भूमिका घेण्याचे ठरले. बाबाराव वाघमारे यांनी आपल्या संबोधनात शेतकऱ्याच्या अडचणी शासन दरबारी प्रभावीपणे मांडल्या जातील. अनेक गावात समितीचा विस्तार केला जाईल असा विश्वास वक्त केला. नवनियुक्त पदधिकाऱ्यांनी शेतकऱ्याच्या न्याय हक्कासाठी एकजुटीने काम करून शासंनाच्या योजना शेवटच्या घटकापर्यत पोहोचवण्याकरिता कटीबद्ध राहू असा निर्धार वक्त केला. यावेळी शेकडोच्या संख्येने पुरुष व महिला उपस्थित होत्या.

## माथनी टोल प्लाझा वर होत आहे लूट...

### नगराध्यक्ष प्रसन्ना तिडके यांचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना निवेदन...

**दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी**

मौदा: माथनी टोल प्लाझा सुरु झाला तेव्हा पासून फोरव्हिलर कार, फाईव्ह व्हीलर ऑटो, ट्रक यांची पास सुरु असतांना एनएचएआय कंपनीने टोल प्लाझा आपल्या अंडर मध्ये घेतला तेव्हा पासून शासनाने काढलेला जी आर बाजूला ठेऊन पासेस बंद केल्या व पैसे वसुल करणे सुरु केले. मौदा नवनियुक्त नगराध्यक्ष प्रसन्ना तिडके यांनी दखल घेत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना निवेदन दिले.

माथनी टोल प्लाझा सुरु झाला तेव्हा पासून वीस किलोमीटर अंतरावर असलेल्या वाहन धारकांना पास ची सुविधा सुरु होती. परंतु ऑक्टोबर २०२५ पासून एनएचएआय(नॅशनल हायवे National Highways authority of India) ह्या कंपनीने चार्ज घेतल्यानंतर सर्व पासेस बंद करून ग्रामीण जनतेकडून ओव्हरलोड चे पैसे





वसुल करणे सुरु केले.

कार ची पास प्रति महिना पन्नास रुपये तर ट्रक ची पास प्रति महिना एक हजार रुपये होती ही ऑक्टोबर २०२५ सुरु असतांना सुद्धा टोल प्लाझा चा नियम धाब्यावर ठेवत एनएचएआय ने आपला नियम सुरु केला व प्रत्येक फेरीला फास्टॅग द्वारा पैसे वसुल करणे सुरु आहे 'त्यातच कोणताही नियम नसतांना ओव्हर लोड चे पैसे वसुल करणे

एनएचएआय कंपनी के नियम से हम चार्ज ले रहे है. आपकी कोई भी पास नही चलेगी, फास्ट टॅग से चार्ज देके आपको जाना पडेगा, ओव्हर लोड भी पे करणा पडेगा...
.. **यादव**, माथनी टोल प्लाझा हेड..

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या कडे मौदा व मौदा तहसील मधील कार, ट्रक वाहन धारकांना पूर्ववत पासेस सुरु करावी असे निवेदन दिले आहे. लवकरच बैठक बोलावून पासेस सुरु करण्याचे आश्वासन दिले आहे.
**प्रसन्ना (राजाभाऊ)तिडके,**
नगराध्यक्ष नगरपंचायत मौदा.

सुरु आहे.

**ओव्हर लोडचे बेकारदेशीर वसुल...**

ओव्हर लोड वाहन असले कि टोल प्लाझा वर बॅरिकेट लावतात आणि वाहन अडवून त्यांच्या कडून जबरीने पैसे वसुल करतात.

फास्टटॅग चे पैसे वसुल करतात त्यांच्या शिवाय टोल ओपन होत नाही. टोल ओपन होऊन सुद्दा ओव्हर लोड चे जोपर्यंत पैसे देत नाही तो पर्यंत बॅरिकेट लावून कर्मचारी वाहनासमोर उभे होतात. दहा चक्का ट्रक चा ओव्हर लोड ची स्लिप देतात त्यावर टोल फी २४५, पेनाल्टी २४५ एकूण ४९० तर बारा चक्का ट्रक चा टोल फी ३५५, पेनाल्टी ३५५ एकूण ७१० वसुल करतात. त्यातच मोठे वाहन असल्यास त्यांच्या कडून जास्त पैसे वसुल करतात.

वाहनाच्या फास्ट टॅग मधून अगोदरच पैसे वसुल करीत आहेत त्यातही हे ओव्हर लोड घेत आहेत. ओव्हरलोड चा वजन ०. ०० दाखवीत असतांना सुद्धा पैसे वसुल करणे सुरु आहे.

## वर्धा येथे राष्ट्रीय खैरे कुणबी समाज संघटनेची विचार मंथन बैठक संपन्न

**दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी**

वर्धा: राष्ट्रीय खैरे कुणबी समाज संघटने च्यावतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९५ व्या जयंतीचे औचित्य साधून विचार मंथन बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीत खैरे कुणबी समाजातील आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक तसेच बेरोजगार तरुणांच्या समस्यांवर विस्तृतपणे चर्चा करण्यात आली. या समस्यांवर संघटनेच्या वतीने प्रयत्न करण्यात येईल. असे संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष गुणेश्वरजी आरिकर यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बाबाराव भोयर यांनी केले, त्यांनी संघटनेच्या मंथन बैठकीच्या उद्देशाची तसेच संघटने च्यावतीने करण्यात येणाऱ्या कार्याची माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष गुणेश्वर आरिकर हे होते तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खैरे कुणबी रणरागिणी मंचच्या अध्यक्षा संगीताताई बढे होत्या. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगद्गुरु श्री संत



तुकाराम महाराज, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले तसेच मॉ जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. बैठकीत विविध जिल्ह्यांतून आलेल्या समाजबांधवांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाला प्रमोदराव भोमले, रामदास बाकरे, दिवाकर तिजारे, प्रकाश भोयर, कपिल थुटे, अरविंदराव बोटफोले, आशिष व्यापारी, कविश्वर खडसे रामटेक, पुस्ताराम भोयर रामटेक, विलास दाबडदुबके रामटेक, राधेश्याम चौधरी रामटेक, विनोद सातपुते हिंगणघाट, चंद्रकांत ससाणे पुलगाव, इ. उपस्थित होते.

कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी बाबाराव भोयर, महादेवराव तांगडे, दिवाकर कोरेकार, राजेंद्र अनफाट, प्रमोदराव भोमले, संगिताताई बढे, दामोदरराव मुडे, प्रकाशराव भोयर यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संचालन चंद्रशेखर ठाकरे यांनी केले तर प्रास्ताविक आणि आभार बाबाराव भोयर यांनी केले.

## महसूल कर्मचाऱ्याला मारहाण करून वाळूचा ट्रक पळवला:तिवसा-कुऱ्हा मार्गावर घडला प्रकार

**दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी**

तिवसा ते कुऱ्हा मार्गावर महसूल विभागाच्या कारवाईदरम्यान जप्त केलेला वाळूचा ट्रक कर्मचाऱ्याला मारहाण करून पळवून नेल्याची धक्कादायक घटना घडली आहे. महसूल सहाय्यक राहुल शंकरराव निस्वादे यांच्या तक्रारीवरून कुऱ्हा पोलिसांनी ट्रकचालक, मालकासह दोन अज्ञातांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

ही घटना ४ जानेवारी रोजी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास घडली. तिवसा महसूल विभागाचे अधिकारी व कर्मचारी गस्तीवर असताना, अंजनसिंगीमार्गे कुऱ्ह्याकडे येणारा एमएच ४९ सीडी ८७३७ क्रमांकाचा दहा चाकी ट्रक थांबवण्यात आला. तहसीलदार डॉ. मयूर कळसे, नायब तहसीलदार आशीष नागरे, महसूल सहाय्यक राहुल निस्वादे, ग्राम महसूल अधिकारी चरणसिंग दुलत आणि महसूल सेवक सूरज माथुलकर यांनी तपासणी केली असता, ट्रकमध्ये अवैध वाळू आढळून आली. त्यामुळे तहसिलदारांनी ट्रक जप्त करून तिवसा तहसील कार्यालयात नेण्याचे निर्देश दिले.

ट्रक तहसील कार्यालयात घेऊन जात असतानाच, एक भरधाव स्विफ्ट डिझायर कार ट्रकच्या आडवी आली. कारमधील दोन अज्ञात व्यक्ती आणि ट्रक मालक खाली उतरले. त्यांनी महसूल सहाय्यक निस्वादे यांची कॉलर पकडून त्यांना बाहेर ओढले, मारहाण केली आणि ट्रकमधील वाळू रस्त्यावर टाकून ट्रक पळवून नेला.

या घटनेनंतर महसूल सहाय्यक निस्वादे यांनी तात्काळ तहसीलदार यांना माहिती दिली आणि कुऱ्हा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीनुसार, चांदुर रेल्वे येथील ट्रकमालक लक्ष्मण चौधरी, ट्रकचालक



आणि दोन अज्ञातांविरुद्ध विविध कलमांखाली गुन्हा नोंदवण्यात आला आहे. कुऱ्हा पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.या घटनेबाबत तिवसा तहसीलदार डॉ. मयूर कळसे यांनी माहिती दिली की, एकाच रात्री दोन ट्रकवर जप्तीची कारवाई करण्यात आली होती, त्यापैकी एक ट्रक कर्मचाऱ्याला मारहाण करून पळवण्यात आला. त्यांनी सांगितले की, ट्रकचालक व मालकाविरुद्ध कुऱ्हा पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करण्यात आली असून, आरटीओ आणि ईटीपीला हा ट्रक ब्लॅकलिस्टमध्ये टाकण्यासंदर्भात पत्र पाठवण्यात आले आहे.

## संत गाडगे बाबा विद्यापीठात कर्मचारी संघाची निवडणूक

### 1 फेब्रुवारीला मतदान आणि निकाल एकाच दिवशी

**दिव्य वतन /जिल्हा प्रतिनिधी**

अमरावती - संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या शिक्षकेतर कर्मचारी संघाची निवडणूक १ फेब्रुवारी रोजी होणार आहे. या निवडणुकीसाठी मतदान आणि मतमोजणी एकाच दिवशी घेतली जाईल. विद्यापीठाने यासंबंधीचे वेळापत्रक जाहीर केले आहे.

निवडणूक अधिकारी म्हणून ऋतुराज दशमुखे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांना विद्यापीठाच्या विद्या विभागातील संजय खोब्रागडे आणि मोहन इंगळे हे सहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून मदत करतील.

निवडणूक अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने जारी केलेल्या वेळापत्रकानुसार, निवडणूक प्रक्रिया १६ जानेवारीपासून सुरू झाली. १६ जानेवारी रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली. या यादीवर १९ जानेवारीपर्यंत आक्षेप नोंदवता येतील, त्यानंतर त्याच दिवशी दुपारी ४ वाजता अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल.

२० जानेवारी रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत नामांकन अर्जांची विक्री केली जाईल. त्यानंतर सलग दोन दिवस, म्हणजेच २० आणि २१ जानेवारी रोजी सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत नामांकन अर्ज स्वीकारले जातील. निवडणुकीचे कामकाज कर्मचारी भवन येथे चालणार आहे.

नामांकन स्वीकारण्याची अंतिम तारीख २१ जानेवारी असून, त्याच दिवशी प्राप्त उमेदवारी अर्जांची छाननी केली जाईल. २१ जानेवारी रोजी सायंकाळी ६.१५ वाजता उमेदवारांची वैध आणि अवैध यादी जाहीर होईल. २२ जानेवारीपासून उमेदवारी अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया सुरू होईल, ज्याची अंतिम तारीख २३ जानेवारी रोजी दुपारी २ वाजेपर्यंत आहे. त्यानंतर लगेच निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांची अंतिम यादी प्रसिद्ध केली जाईल.

१ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ ते दुपारी १ या वेळेत विद्यापीठातील डॉ. पंजाबराव




उपाख्य भाऊसाहेब देशमुख अधिसभा सभागृहात मतदान होईल. मतदानानंतर लगेचच दुपारी २ वाजल्यापासून मतमोजणी सुरू केली जाईल आणि मतमोजणी पूर्ण होताच निकाल घोषित केला जाईल.

# आद्य पत्रकार दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर

मराठी भाषेतील आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांची आज जयंती. बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण हे मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र सुरू केले हे वृत्तपत्र पाक्षिक स्वरूपात होते. बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्म कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यातील पोंभूर्ले या गावी ६ जानेवारी १८१२ रोजी झाला. विशेष म्हणजे त्यांनी त्यांच्या जन्मदिनीच म्हणजे ६ जानेवारी १८३२ रोजी दर्पण हे महाराष्ट्रातील पहिले पाक्षिक सुरू केले. वयाच्या विसाव्या वर्षीच दर्पण हे पाक्षिक सुरू करून बाळशास्त्री जांभेकर यांनी मराठी वृत्तपत्र व्यवसायाचा पाया घातला. त्यांनीच १८४० मध्ये दिग्दर्शन हे मराठीतील पहिले मासिक काढले. बाळशास्त्री जांभेकर यांचा लोकशिक्षण व ज्ञानप्रसार हाच हेतू या उपक्रमामागे होता. सुधारकांच्या पहिल्या पिढीने पाश्चात्य विद्या व शिक्षण आत्मसात करून नवी जीवनमूल्ये वृत्तपत्र माध्यमाद्वारे रुजवली. त्या परंपरेचा पाया बाळशास्त्री जांभेकरांनी घातला. बंगालमध्ये राजाराम मोहन रॉय यांनी सुधारणांचे युग आरंभिले तेच कार्य बाळशास्त्री जांभेकरांनी महाराष्ट्रात केले. बाळशास्त्री जांभेकर हे लहानपणापासून हुशार होते. वयाच्या तेराव्या वर्षी त्यांनी मराठी आणि संस्कृत विषयाचे अध्ययन पूर्ण केले. नंतर ते मुंबईला गेले तिथे त्यांनी इंग्रजी विषयाचे शिक्षण पूर्ण केले. इंग्रजी विषयात देखील त्यांनी नैपुण्य मिळवले. इंग्रजीतील त्यांचे नैपुण्य पाहून इंग्रज राज्यकर्त्यांनी त्यांची एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून नेमणूक केली. त्या कॉलेजमध्ये एकूण सतरा प्राध्यापक होते त्यात बाळशास्त्री जांभेकर हे एकमेव मराठी प्राध्यापक होते. दादाभाई नौरोजी हे त्यांचेच विद्यार्थी होते. पुढे त्यांची नेमणूक शाळा तपासणीस म्हणून झाली. बोर्ड ऑफ एज्युकेशनने चांगले अध्यापक तयार करावेत अशी सूचना त्यांनी इंग्रज सरकारला केली ती सूचना मान्य करून इंग्रज सरकारने डीएड, बीएड कॉलेजची निर्मिती केली. ते शिक्षणाबाबत जितके आग्रही होते तितकेच ते सामाजिक सुधारणे बाबत आग्रही होते. केवळ शिक्षणाचा प्रसार करून चालणार नाही तर सनातनी आणि प्रतिगामी लोकांच्या मनावर बेगडी श्रद्धांचा जो कालबाह्य पगडा आहे तो हटवला पाहिजे. लोकांच्या भावना, संवेदना विशाल उदार झाल्या पाहिजेत असे त्यांचे मत होते त्याकरिताच त्यांनी दर्पण नावाचे पाक्षिक सुरू केले. दर्पणचा पहिला अंक ६ जानेवारी १८३२ रोजी प्रकाशित झाला. दर्पण हे द्विभाषिक पाक्षिक होते. एकाच वेळी इंगजी व मराठीत निघणाऱ्या या पक्षिकाच्या पानातील दोन स्तंभात डावीकडचा स्तंभ इंग्रजी भाषेत तर उजवीकडच्या स्तंभात मराठी भाषांतर असे त्यात एकूण आठ पाने असत. बाळशास्त्री जांभेकर यांनी वाचकांची मागणी वाढू लागल्याने दर्पण साप्ताहिक ४ मे १८३२ पासून सुरू केले. बाळशास्त्री जांभेकर हे निर्भीड पत्रकार होते. त्यांचे लेख विचारप्रवर्तक असत. इंग्रजांच्या नोकरीत असूनही ते इंग्रज सरकार विरुद्ध बेधडक लिहायचे त्याचप्रमाणे जातपात, कर्मकांड, अनिष्ट रूढी परंपरा यावर ते आपल्या लेखणीतून सातत्याने प्रहार करीत. ६ जानेवारी हा बाळशास्त्री जांभेकरांचा जन्मदिवस आणि योगायोगाने ६ जानेवारी रोजीच दर्पणचा पहिला अंक प्रकाशित झाला असल्यामुळे हा दिवस महाराष्ट्रात पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी निर्भीड पत्रकारिता करणाऱ्या पत्रकारांना विविध संस्थांकडून गौरविले जाते. त्यांचा सन्मान केला जातो. १८ मे १८४६ रोजी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकरांचे निधन झाले. जयंतीदिनी बाळशास्त्री जांभेकरांना विनम्र अभिवादन! तसेच सर्व पत्रकार बंधूंना पत्रकार दिनाच्या मनापासून शुभेच्छा!

श्याम ठाणेदार

## सेल्फी संस्कृती आणि सेलिब्रिटींची सुरक्षितता : संयमाची खरी कसोटी


आजच्या डिजिटल युगात सेल्फी ही केवळ आठवण न राहता एक प्रकारची स्पर्धा बनली आहे. कोणत्या क्षणी, कोणासोबत आणि कोणत्या ठिकाणी फोटो काढला, याला अनन्यसाधारण महत्त्व दिले जात आहे. मात्र या सेल्फी संस्कृतीला मर्यादांचे भान राहिले नाही, तर ती धोकादायक ठरू शकते, याचे ताजे उदाहरण माजी भारतीय कर्णधार रोहित शर्मासोबत घडलेल्या घटनेतून समोर आले आहे. अलीकडे सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये, धावत्या कारमध्ये बसलेल्या रोहित शर्माचा हात चाहत्याने सेल्फीसाठी ओढल्याचे स्पष्ट दिसते. ही घटना केवळ एका क्रिकेटपटूशी संबंधित नसून, समाजातील वाढत्या असंवेदनशीलतेचेही प्रतिबिंब आहे. रोहितने प्रसंगावधान राखत कोणताही आक्रमक प्रतिसाद न देता, संयमाने परिस्थिती हाताळली आणि कारची खिडकी बंद करून पुढे गेला. हा प्रसंग रोहितच्या परिपक्वतेचे दर्शन घडवतो. सेलिब्रिटी म्हणजे सार्वजनिक मालमत्ता नाहीत, हे अनेकदा विसरले जाते. कलाकार, खेळाडू, राजकीय नेते हे लोक समाजासाठी आदर्श असले, तरी त्यांनाही वैयक्तिक सुरक्षितता, गोपनीयता आणि सन्मानाचा अधिकार आहे. सेल्फी घेण्याच्या नादात कुणाचा हात पकडणे, ओढणे किंवा जबरदस्ती करणे, हे केवळ अयोग्यच नाही तर कायदेशीर गुन्ह्याच्या कक्षेतही येऊ शकते. रोहित शर्मासारखा आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू, ज्याने भारताला अनेक ऐतिहासिक विजय मिळवून दिले, ज्याने विक्रमांची मालिकाच रचली, त्याच्याशीही अशी वागणूक दिली जात असेल, तर सामान्य कलाकार किंवा खेळाडूंची अवस्था काय असेल, हा प्रश्न उपस्थित होतो. प्रसिद्धी म्हणजे सर्व काही सहन करण्याची सक्ती नव्हे. या घटनेतून रोहितचा संयम आणि सुसंस्कृत वागणूक कौतुकास्पद आहे. कोणताही वाद न करता, कोणालाही दुखावले नाही, तरीही स्वतःची सुरक्षितता जपली. हीच खरी स्टारडमची ओळख आहे. मात्र समाज म्हणून आपणही आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. आदर्श व्यक्तींकडून प्रेरणा घ्यायची असेल, तर त्यांच्या सीमांचाही सन्मान करायला हवा. प्रशासन आणि सुरक्षायंत्रणांनीही अशा घटनांकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे.

# तिचं माहेरपण...

वसुधाला शाळेत जायची घाई होती.. गावातल्याच जि.प.च्या शाळेत ती प्राथमिक शिक्षिका म्हणून काम करत होती.घरात ती ,तिचा पती महेश व एक पाच वर्षांचा मुलगा आयुष अशी तीनच माणसं..तिच्या सासूबाई तिच्या जावेचे बाळ छोटं असल्याने तिच्या कडे गेल्या होत्या.एकेक कामं ती पटापटा आवरत होती. एवढ्यात दाराची बेल वाजली.. तीने घाईने दरवाजा उघडला; तो समोर तिला रखमाबाई दिसल्या. त्यांना पाहून ती म्हणाली,"काय काकू आज एवढ्या लवकर?"रखमाबाई म्हणाल्या,"हो ताई आज मला जरा घाई हाय म्हणून सगळे काम बिगिन उरकावं म्हणलं." यावर वसुधा म्हणाली,"कशाची हो एवढी घाई? रखमाबाई म्हणाल्या," ताई मी आता दोन-तीन दिवस कामाला येणार नाही., वसुधा म्हणाली,"का कुठे जाणार आहात? की तब्येत ठीक नाही तुमची!"नाही ताई तब्येत चांगली हाय माजी. पण पोरीने लय नाद लावलाय चार दिवस तिच्याकडे जाऊन येते. वसुधाला मात्र समोर संकट उभा राहिल्या सारखं वाटलं. गेल्या चार-पाच वर्षापासून रखमाबाई तिच्याकडे कामाला येत होत्या. कपडे भांडे व साफसफाई सगळं काही त्याच करायचा. त्यामुळे त्यांचा तिला मोठाच आधार वाटायचा. रखमाबाईंना एक मुलगी व एकच मुलगा दोघांचेही लग्न झाले. मुलगी सासरी सुखात. मुलगाही आपल्या बायकोला घेऊन दुसरीकडे राहतो. त्याच्या बायकोचे व रखमाबाईंचे पटत नाही. त्यामुळे त्या एकट्याच राहायच्या. स्वतःचा उदरनिर्वाह चालवण्यासाठी अनेक घरची कामं करायच्या. एका अपघातात मुलं लहान असतानाच त्यांच्या पतीचे निधन झालेले असल्याने खूप कष्टाने त्यांनी मुलांचा सांभाळ केला. वसुधाला एका क्षणात सारं काही डोळ्यांसमोर आलं..तंद्रीतच ती भानावर आली.रखमाबाईंनी आपले काम करायला सुरुवात केली. कपडे भिजवून ठेवले व भांडी घासायला घेतली.भांडे घासतच त्या बोलू लागल्या,"काय माहित ताई नेमकं पोरीच्या काय मनात हाय त्या दिवशी फोन आला होता तिचा. लईच नाद लावलाय बघा ये म्हणून... मला तर भ्या वाटायलयं जावयाचं अन् तिचं काही बिनसलं तर नसेल...?" वसुधा म्हणाली,"नाही हो काकू असा काही वाईट विचार मनात आणू नका. चांगलं चाललंय तुमच्या राधाचं... सहजच तुमच्या भेटीसाठी बोलावलं असेल तिनं." रखमाबाई त्यांची काम करून निघून गेल्या. वसुधाही शाळेला गेली. रखमाबाई गेल्यावर तशी तिची दोन-चार दिवस बरीच धावपळ झाली. मुलाचा डब्बा ,नवऱ्याचा डब्बा ... घरातील सगळी काम करता -करता तिची पुरे दम छाक झाली. तिच्या सासुबाई तिच्याकडे होत्या तोपर्यंत त्यांचा खूप आधार वाटायचा. आता त्या जावेकडे गेल्यामुळे घरात कोणाचाच आधार नव्हता. तीन-चार दिवसाच्या सुट्टीनंतर रखमाबाई सकाळी पुन्हा कामावर हजर झाल्या. आल्या तशा त्यांच्या कामाला लागल्या. वसुधाने विचारलं,"काय झालं काकू कशाला बोलावलं होतं राधाने तुम्हाला? यावर रखमाबाई म्हणाल्या,"काय सांगू ताई मला वाटलं तसं काय बी नव्हतं. तिचा संसार लई सुखाचा झालाय. तिनं मला माहेरपणासाठी बोलावलं होतं," हे शब्द ऐकून वसुधाला आश्चर्यच वाटलं. रखमाई सांगत होत्या,"मी तिच्या दारात जातात तिने भाकरीचा तुकडा माझ्यावरून ओवाळून टाकला. पाय धुवायला पाणी दिलं . चार दिवसात वेगवेगळे पदार्थ करून खाऊ घातले. मायेने न्हाऊ- माखू घातलं. एखाद्या पोरीचे माहेरी व्हावे तसेच सारे लाड तिने माझे केले. जीवाला लई बरं वाटलं. अन् पोरीचं कौतुक बी वाटलं, जावयानं बी मला आईसारखी माया लावली. तिच्या सासूबाई बी माज्या राधीचं लय कौतुक करू लागल्या. दोन सोन्यासारखे नातवंड आजी -आजी म्हणून जवळ येऊ लागले. जावयाने भारीची साडी घेतली.माझ्या जन्माचे सार्थक झाल्यासारखं वाटलं." सखमाबाईच्या लेकीने त्यांचे केलेले माहेरपण ऐकून वसुधाचे डोळे भरून आले. तिलाही तिच्या आईची खूप आठवण आली. भाऊ नोकरीसाठी पुण्याला होता. रखमाबाईंची आणि तिच्या आईची कथा थोडीशी सारखीच होती. तिच्या बाबांचेही असेच ती लहान असतानाच अल्पशा आजाराने निधन झालेले होते.आईने शाळेत सेविकेची नोकरी केली होती.मोठ्या धीराने दोन्ही मुलांना शिकवले व त्यांची लग्न करून दिली होती.त्यामुळे वसुधाला रखमाबाईंमध्ये आईच दिसायची. रखमाबाई त्यांचे काम करून निघून गेल्या. वसुधाचे चित्त मात्र आज थाऱ्यावर नव्हते. तिच्याही मनात सारखा आईच्या माहेरपणाचाच विचार येत होता. तिलाही वाटत होते आईला चार दिवस आपल्या घरी आणावं. आपण माहेरी गेल्यावर आई आपल्यासाठी जे जे करते ते ते सारं काही तिच्यासाठी करावं. तिला किती -किती आनंद होईल. आईच्या माहेरपणाच्या विचारातच ती आज घरी आली. घरी आल्यावर आपल्या मनातला विचार तिने आपल्या पतीला महेशला बोलून दाखवला... त्यालाही तिची ही कल्पना खूप आवडली.आपल्या सासूच्या कष्टांची त्याला चांगलीच जाणीव होती.तो वसुधाला म्हणाला,"वसु खूप छान कल्पना आहे तुझी.. आपण आईंना थोडा जरी आनंद देऊ शकलो तर मलाही खूप छान वाटेल. आता सात -आठ दिवसात दिवाळीच्या सुट्ट्या येत आहेत. दरवर्षी तू आईकडे दिवाळीला जातेस यावर्षी त्यांनाच आपल्या घरी बोलवू. यावर्षीची दिवाळी आपण त्यांच्यासोबत आपल्या घरीच साजरी करु.काय कशी काय वाटली माझी कल्पना?"यावर वसुधा काय म्हणणार ती आनंदाने भारावून गेली. कधी एकदा दिवाळीच्या सुट्ट्या लागतात व कधी आई आपल्या घरी येते असे तिला झाले. सात -आठ दिवस निघून गेले. सुट्ट्यांमध्ये आठ दिवस आईसाठी काय- काय करायचे याचे नियोजन वसुधा करू लागली.आईला तिने काहीच कल्पना दिली नव्हती. तिने आईला फोन करून ,"उद्या तुला घेण्यासाठी तुझे जावाई येणार आहेत असं सांगितलं. आईला म्हणाली," आई आम्ही या सुट्ट्यांमध्ये देवदर्शनासाठी जाणार आहोत.तुला सोबत घेऊन जायचे आहे त्यामुळे तू त्यांच्यासोबत उद्या ये. लेकीचे हे शब्द ऐकून मंदाबाईंना अवघडल्यासारखं वाटलं. हो नाही म्हणत त्या जावयासोबत यायला तयार झाल्या.महेश तिच्या आईला आणण्यासाठी तिच्या माहेरी गेला . जावयाला अंगणात पाहून वसुधाच्या आई स्वागतासाठी पुढे आल्या. हात -पाय धुवायला पाणी दिले.चहा- पाणी झाल्यावर थोड्या विश्रांतीनंतर जेवायला वाढले. जावयाच्या आवडीचे चिंचगुळाचे वरण ,अळुच्या वड्या, मुगाचा शिरा, भात ,भजे ,पापड कोशिंबीर असे सारे पदार्थ त्यांनी केले होते. महेशचे जेवण झाल्यावर. मंदाबाईंनी जेवण केले सगळी आवरा आवर केली व थोडा वेळ आराम करून दोघेही निघाले. इकडे आई येणार म्हणून वसुधा आतूर झाली होती.दोन- चार दिवसांवर दिवाळी आली होती. तिने आई येण्याआधीच बरेचसे फराळाचे पदार्थ करून ठेवले होते. स्वयंपाकाची सर्व तयारी झाली होती.एवढ्यात दारात गाडी आल्याचा आवाज आला. वसुधा लगबगीने बाहेर आली.तिने सकाळीच दारात छानशी रांगोळी काढली होती. हातात औक्षणाचे ताट होते. तिने आधी आईवरुन भाकरीचा तुकडा ओवाळून टाकला व नंतर पाय धुऊन औक्षण केले. हे सर्व करत असतानाचा व्हिडिओ आयुष बनवतच होता. हे सर्व पाहून मंदाबाईंचे मन भरून आले. वसुधा लगेच आईच्या कुशीत शिरली. त्यांच्या डोळ्यात आनंदाश्रू वाहू लागले. थोडा वेळ चहा- पाणी इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर वसुधाने गरम गरम पोळ्या टाकल्या व जेवायला वाढून घेतले. वसुधाच्या आईने तिच्यासाठी आणलेले एक -एक पदार्थ पिशवीतून बाहेर काढले. आंबा, लिंबू ,मिरची असे वेगवेगळे लोणचे ,पापड, कुरडया, शेवया ,काळा मसाला असं बरंच काही त्यांनी आणलं होतं. सारे सामान त्यांनी वेगवेगळ्या डब्यांमध्ये, बरण्यामध्ये भरुन ठेवलं. सगळ्यांची जेवण झाली. आजी आल्याने आयुष खूप आनंदी झाला होता. सारखा आजीच्या अवतीभोवती फिरायचा ,मांडीवर बसायचा आजी कडून कोड कौतुक करून घ्यायचा, हे पाहून वसुधाला खूप आनंद वाटायचा. दुसऱ्या दिवशी पहाटेच तुळजापूर, पंढरपूर व इतर ठिकाणी फिरायला जाण्याचा बेत ठरला. वसुधाने सगळी तयारी आधीपासूनच करून ठेवलेली होती आईच सामान तेवढे घेणे बाकी होतं. दोन दिवस बाहेर फिरून नंतर घरीच दिवाळी साजरी करायची असा विचार वसुधा व महेशचा होता. त्याप्रमाणे ते दोन दिवसात खूप छान सगळीकडे फिरून आले. दोन दिवसांची ही यात्रा संस्मरणीय झाली होती. आईंनाही एकटे एकटे राहून खूप कंटाळावानं वाटत होतं या दोन दिवसात तिला जणू भरभरून जगायला मिळालं. याचं मनस्वी समाधान वसुधाला वाटत होतं.आता दिवाळी सुरू झाली होती. वसुबारस, धनत्रयोदशी, नरक चतुर्दशी, लक्ष्मीपूजन ,बलिप्रतिपदा , पाडवा व भाऊबीज दिवाळीचे सर्वच दिवस खूप आनंदात गेले. वसुधाने आईला आवडणारे एकेक पदार्थ दररोज तिला करून खाऊ घातले. मंदाबाईंना लेकीची माया पाहून डोळे भरून यायचे. क्षणोक्षणी तिच्या बाबांची आठवण यायची. पण लेकीचा सुखाचा संसार पाहून त्या समाधान मानत. असेच पाहता पाहता आठ दिवस निघून गेले.दिवाळीचे दिवस संपून गेले.वसुधाने आईचे माहेरपण करण्यात कोणतीही उणीव ठेवली नाही.लेकीच्या घरचे हे माहेरपण पाहून मंदाबाईना त्यांच्या आईची आठवण झाली.त्या वसुधाला म्हणाल्या, "वसु खूप छान वाटलं गं तुझ्या घरचं हे माहेरपण. मला तर वाटतं प्रत्येक मुलींनी असं आईचं माहेरपण केलं पाहिजे. तेवढेच चार दिवस आनंदात जगता येतं."यावर वसुधा आईला म्हणाली,"हो आई अगदी खरं आहे तुझं. प्रत्येक आई आपल्या मुलींसाठी किती करत असते. पण उतारवयात तिलाही मायेची गरज असतेच की गं . मी यापुढे नेहमीच तुला असं माहेरपणाला माझ्याकडे घेऊन येईन. खूप छान वाटलं.. आईची आई होण्याचं वेगळेच समाधान मिळालं मला. आता आईची गावी जायची वेळ झाली होती. वसुधाने त्यांची बॅग भरून दिली व त्यांच्यासाठी आणलेली छानशी साडी त्यांना नेसायला दिली. आईच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून वसुधाला खूप छान वाटलं. महेशने आईची बॅग गाडीमध्ये ठेवली.. आयुषला एकदा जवळ घेऊन मंदाबाईंनी त्याचा पापा घेतला. वसुधाच्या पाठीवरून, डोक्यावरून मायेने हात फिरवून तिला कुशीत घेतलं. त्यांचे डोळे भरून आले होते वसुधाच्याही डोळ्यात नकळत पाणी आलं... मंदाबाई गाडीत बसल्या...नजर जाईल तोपर्यंत हात हलवून टाटा करत होत्या. पदराने डोळे पुसत होत्या... लेकीच्या माहेरपणाच्या सुंदर आठवणी सोबत घेऊन त्या पुन्हा नव्या उमेदीने जगण्यासाठी निघाल्या होत्या...

सौ.शारदा श्रीकृष्ण वानखेडे-चोपडे

# सूर्य झाकून शिराळ करणारा विद्या ठाकूर यांच्या कवितेतील 'बाप'




बाप आणि बापाचं नातं हे निश्चितपणे आकलनाच्या पलीकडे आहे, असे म्हणावे लागेल. कारण, बाप नावाचं नातं आपल्याला समजलं असतं तर, बाप कधीच आपल्या जीवनातून दुर्लक्षित झाला नसता. प्रत्येक मुलाच्या आणि मुलीच्या जीवनामध्ये अतिशय प्रभावी भूमिका निभवणारा बाप हा कायम उपेक्षित राहिलेला आपण समाजामध्ये आणि साहित्यामध्ये पाहतो. बाप हा दुर्लक्षित होण्यामागचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्याचे आणि बाप नावाच्या नात्याचे आपल्या सर्वांना न झालेले आकलन होय. थोडक्यात, काय तर , बाप समजायला थोडा कठीण जातो. कुटुंबामध्ये बापपणाची भूमिका निभावत असतांना , तो दिसतो एक आणि असतो काही वेगळा. म्हणजे थोडक्यात, सांगायचे झाले तर, फणसासारखा... त्यामुळे तो बऱ्याच वेळा मुलांना कळत नाही. तो आपल्या सर्वांच्या आकलनाच्या पलीकडचा असतो. म्हणून, कदाचित शब्दांपासूनही खूप दूर असतो. बापाचं योग्य असं वर्णन स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालय, शिरूर ताजबंद, लातूर या ठिकाणी कार्यरत असलेल्या कवयित्री विद्या बयास ठाकूर यांनी त्यांच्या 'बाप' या कवितेत केले आहे. विद्या बयास ठाकूर यांचा 'आभाळ अंतरीचे' हा काव्यसंग्रह व 'तळझिरा' हा ललित लेखसंग्रह प्रकाशित आहे. त्यांना साहित्य क्षेत्रामध्ये विविध पुरस्कार प्राप्त झाले असून, त्या अनेक दैनिकांमध्ये आणि मासिकांमध्ये लेखन करतात.

अतिशय स्पष्ट शब्दांमध्ये आणि शुद्ध अंतकरणाने कवयित्रीने बापाचं आकलन न झाल्याची कबुली कवितेच्या सुरुवातीला दिली आहे. सोबतच 'बाप' हा शब्दांपासून खूप दूर असल्याचे त्या सांगतात. बाप नावाच्या नात्याचं वेगळेपण, अतिशय वेगळ्या पद्धतीने कवयित्रीने मांडले असून ते आकलनाच्या पलीकडे आहे,असे सांगताना त्यांनी या नात्याचे केलेले आकलनही अधोरेखित होते. शब्दपलीकडचं असलेलं बापाचं नातं कवयित्रीने कवितेच्या पुढील ओळीतून शब्दबद्ध केले आहे...

बाप नावाचं ते नातं नेहमीच<br>
माझ्या आकलनाच्या पलिकडे<br>
शब्दांपासून खूप दूर<br>
आकलनापलीकडचे असलेले

बापाचे नाते समजून घेण्याकरिता 'बाप' शोधण्याचा कवयित्रीने केलेला प्रामाणिक प्रयत्न कवितेमध्ये दिसतो. बाप शोधतांना, कवयित्री म्हणतात की, मी खालच्या मानेनं बाप शोधत राहायची. 'खाल मानेनं ' हा शब्द आपल्याला बापाविषयी लेकीच्या मनामध्ये असलेली भीती दाखविणारा वाटू शकतो ? , परंतु, मला असं वाटते की, कवयित्री अतिशय आदराच्या भावनेतून 'बाप' जाणून घेण्याचा प्रयत्न करत असल्यामुळे असा शब्दप्रयोग केला असावा.'स्नीग्ध वात्सल्याचे झरे' असे शब्द कवितेत वाचावयास मिळतात. स्नीग्ध या शब्दाचा अर्थ तेलकट असा होतो. बाप हा वासल्याचा झरा असल्याची कबुली कवयित्रीने कवितेत दिली आहे. बापाच्या नजरेमध्ये असलेले वात्सल्य हे नियमितपणे कवयित्रीने बघितले आहे. लेकी विषयी असलेल्या वात्सल्याने भरून आलेले डोळे कवयित्रीला दिसलेत. तो बापाचा भाव हा कवयित्रीला 'स्नीग्ध वात्सल्याचे झरे' असल्यासारखा वाटतो.कवितेमध्ये विरोधाभास पाहावयास मिळतो. बापाच्या अंगी असलेले वात्सल्य आणि ताठपणा अशा दोन्ही गोष्टी कवयित्रीने विशद केल्या आहेत. बाप एखाद्या माडासारखा म्हणजे उंच झाडासारखा करारी आणि भेदक नजरेस,भावनाहीन वृत्तीसह कुटुंबासाठी आणि आपल्या लेकीसाठी उभा असतो. छायाविहीन या शब्दावरून बापाचे अव्यक्त भावना विश्व कवयित्रीने शब्दबद्ध केले आहे. बापाच्या नजरेतील वात्सल्य आणि करारी, भेदक नजर ही कवयित्रीने कवितेच्या पुढील ओळीमधून व्यक्त केली आहे...

मी शोधत राहायची खाल मानेनं<br>
बापाच्या नजरेत<br>
स्नीग्ध वात्सल्याचे झरे<br>
बाप मात्र ताठ उभा असायचा<br>
छायाविहीन माडासारखा<br>
त्याच्या करारी,भेदक नजरेसह

उंच झाडाप्रमाणे भावनाशून्य आणि ताठर दिसणारा हा 'बाप' मुळासकट गदगदताना कवयित्रीने तिच्या पाठविण्याच्या वेळी मांडवात बघितला. बापाला लेकीविषय असलेले टोकाचे प्रेम तो कधीच व्यक्त करीत नाही. परंतु, लग्न समारंभामध्ये ज्या वेळेला मुलीला तिच्या सासरी पाठवण्याची वेळ येते. त्या वेळी मात्र, बापाच्या भावनेचा बांध फुटतो. बापाच्या रोमारोमातून लेकी विषयी असलेला प्रेम व्यक्त होते. हे सर्व पाहतांना खऱ्या अर्थाने लेकीला आपला 'बाप' समजतो, असे म्हणता येईल. बापाचं हे प्रेम रूप पाहिल्यानंतर कवयित्री सांगतात की, माझ्या आत.. माझ्या हृदयामध्ये बापाविषयी जे खोलवर साचलं होतं. ते सर्व पाठवणीच्या मांडवात त्याच क्षणी वाहून गेलं. बापाची भूमिका आणि भावना व्यक्त करणाऱ्या कवितेतील पुढील ओळी आहेत...

हा ऊंच माडमुळासकट<br>
गदगदताना बघीतला<br>
माझ्या पाठवणीच्या मांडवात<br>
त्याच्या रंध्रारंध्रांतून<br>
वाहीलेल्या लाटांत<br>
खूप काही वाहून गेलं<br>
माझ्या आत,खोलवर साचलेलं

अनेकदा आपल्याला ऐकायला येते की, बाप हा बऱ्याच लोकांना गेल्यानंतर कळतो. बाप जेव्हा जगाचा निरोप घेतो, त्यावेळेला मुलांवर उन्हाचा एक तीव्र लोळ आदळतो. म्हणजे, अनेक संकटे मुलांच्या डोक्यावर येऊन पडतात. बाप गेल्यानंतर आलेल्या संकटाची जाणीव झाल्याचे कवयित्रीने अधोरेखित केले आहे. बाप गेल्यानंतर ज्यावेळेला मुलांवर संकटे येतात, त्यावेळी मुलांना बाप समजतो. कवयित्री बाप गेल्यानंतरचा त्यांचा अनुभव व्यक्त करतांना म्हणते की, उंच झाडासारखा वाटणारा बाप... करारी आणि कडव्या नजरेचा वाटणारा बाप... हा आपल्यासाठी 'मधाळ ढग' होता. मधाळ म्हणजे प्रेमळ... मधाळ म्हणजे मधासारखा. 'मधाळ ढग' ही कवितेतील अतिशय महत्त्वाची प्रतिमा आहे.मुलांच्या नजरेच्या आणि विचाराच्या आवाक्याबाहेर असलेली संकटे... त्या सर्व संकटापासून मुलांचा बचाव करण्यासाठी सुरक्षा कवच म्हणून काम करणारा बाप अनेकदा मुलांना समजत नाही. पण, जेव्हा बाप जातो त्यावेळेला सूर्यप्रकाशाइतकी प्रखर संकटे जेव्हा मुलांना चटके देत असतात तेव्हा बाप आपल्यासाठी काय होता ? त्याची जाणीव मुलांना नक्की होते.मुलांच्या नजरेच्या पलीकडील संकटाचे चटके मुलांना बसू नयेत म्हणून मुलांसाठी शिराळा म्हणजे शिळावन करणारा जगातील एकमेव व्यक्ती म्हणजे 'बाप 'होय. शिराळ म्हणजे काय ? तर, उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये सूर्य तापत असतांना अचानक सूर्याच्या प्रखर तेजाच्या आड एखादा ढग यावा आणि सूर्याची दहाकता कमी व्हावी, याला शिराळ किंवा शिळावन असे म्हणतात. जीवनात परिस्थितीचे चटके बसत असतांना बाप हा मुलांसाठी शिराळ करणारा ढग असतो, असा आशय कवयित्री विद्या ठाकूर यांनी कवितेच्या पुढील ओळींमध्ये व्यक्त केला आहे...

त्याच्या जाण्यासरशी<br>
डोक्यावर आदळला<br>
उन्हाचा एक तीव्र लोळ अन् जाणवलं<br>
बाप माड कुठलातो<br>
तर मधाळ ढग होता<br>
माझ्या नजरेच्या टप्प्यापलीकडचा<br>
सुर्य झाकून माझ्यासाठी<br>
शिराळ करणारा

आकलनाच्या पलीकडे असलेला बाप... शब्दांपासून खूप दूर असलेला बाप... उंच झाडासारखा असलेला बाप.... वात्सल्याचा झरा असलेला बाप... आणि आपल्या मुलांसाठी जीवनामध्ये शिराळ निर्माण करणार बाप... कवयित्रीने आपल्या सूक्ष्म निरीक्षणातून अतिशय प्रभावीपणे प्रस्तुत कवितेमध्ये शब्दबद्ध केला आहे.

भगवान राईतकर ( गोभणीकर )<br>
मेहकर

दिव्य वतन हे दैनिक वृत्तपत्र प्रकाशक मालक मुख्य संपादक गोपाल आनंदराव कडुकर यांनी कार्यालय हाऊस नंबर १८ निवास सोसायटी स्वामी समर्थ मंदिर जवळ घोगली रोड बेसा तालुका जिल्हा नागपूर - ४४००३४ येथून प्रकाशित केले. संपर्क मो. ७७०९३७७५१०

## महत्त्वाचे...



### पोलिस पाटलांच्या रिक्त पदांची आरक्षण सोडत जाहीर

कळमनुरी तालुक्यात पोलिस पाटील पदांच्या रिक्त असलेल्या ८९ जागांसाठी सोमवारी ता. ५ उपविभागीय अधिकारी कार्यालयात आरक्षण सोडत झाली असून यामध्ये २८ गावांचा पोलिस पाटील पदाचा पदभार महिला पाहणार आहेत. यामध्ये काही मोठ्या गावांचाही समावेश आहे. पुढील काही दिवसांतच निवडीची प्रक्रिया सुरु होणार आहे.कळमनुरी तालुक्यातील ८९ गावाचे पोलिस पाटील पद रिक्त होते. त्यामुळे गावपातळीवरील माहिती देणे व इतर कामांसाठी लगतच्या गावांतील पोलिस पाटील यांना काम करावे लागत होते. त्यानंतर पोलिस पाटील पदाची भरती घेण्याचा निर्णय झाला. त्यानुसार जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी ता. २३ डिसेंबर रोजी परिपत्रक काढून पोलिस पाटील पदाचे आरक्षण निश्चित करून भरती प्रक्रिया सुरु करण्याच्या सूचना दिल्या होत्या.त्यानुसार आज कळमनुरीच्या उपविभागीय अधिकारी कार्यालयातील माजी राष्ट्रपती एपीजे अब्दूल कलाम सभागृहात आरक्षण सोडत घेण्यात आली.

### जवाहर नवोदय विद्यालयात विद्यार्थिनीचा मृत्यू



लातूर- लगतच्या जवाहर नवोदय विद्यालयात इयत्ता सहावीच्या एका विद्यार्थिनीचा संशयास्पद मृत्यू झाला आहे. शालेय प्रशासनाने हा आत्महत्येचा प्रकार असल्याचा दावा केला आहे. तर मृत मुलीच्या नातेवाईकांनी हा घातपात असल्याचा आरोप केला आहे. पीडित कुटुंबीयांनी आज अचानक लातूर शहरात रास्ता रोको करत दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली. यामुळे येथील वातावरण चांगलेच तापले आहे. यासंबंधीच्या माहितीनुसार, अनुष्का किरण पाटोळे असे मृत विद्यार्थिनीचे नाव आहे. ती लातूर शहरालगत असणाऱ्या जवाहर नवोदय विद्यालयात इयत्ता सहावीत शिकत होती. काल तिचा मृतदेह पलंगाला लटकलेल्या स्थितीत आढळून आला. यामुळे एकच खळबळ माजली. ही बातमी लातूर शहरात वाऱ्यासारखी पसरली. त्यामुळे जवाहर नवोदय विद्यालय परिसरात मोठ्या प्रमाणात जमाव जमला होता. मृत विद्यार्थिनीच्या नातेवाईकांनी या शाळेत विद्यार्थ्यांना मारहाण होत असल्याचा आरोप केला आहे. यामुळे ही घटना आत्महत्येची नव्हे तर घातपाताची असल्याचा दावा केला जात आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### महिलांनी लातूर शहरात केला रास्ता रोको

दुसरीकडे, या घटनेच्या निषेधार्थ आज महिलांनी लातूर शहरातील गांधी चौकात अचानक रास्ता रोको केला. त्यांनी साड्यांची दोरी करत रास्ता रोको केला. यामुळे गाधी चौकातील वाहतूक पूर्णतः ठप्प झाली. चौकात दोन्ही बाजूंनी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. दोषींना आमच्या ताब्यात द्या.

# लाडक्या बहिणींना लखपती दीदी बनवणार

## मी मुख्यमंत्री असेपर्यंत योजना बंद होणार नाही, देवेंद्र फडणवीसांची मोठी घोषणा



दिव्य वतन /वृत्तसेवा

आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांनी आता जोरदार प्रचार सुरू केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आज परभणीच्या दौऱ्यावर असताना त्यांच्या सभेत बोलताना लाडकी बहीण योजनेसंदर्भात मोठी घोषणा केली. देवा भाऊ मुख्यमंत्री असेपर्यंत लाडकी बहीण योजना बंद होणार नाही, असे विधान फडणवीसांनी केले आहे.

सभेत बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, आज या ठिकाणी इतक्या मोठ्या प्रमाणात लाडक्या बहिणी या ठिकाणी उपस्थित आहेत. आपल्याला माहित आहे ज्या वेळेस प्रचंड मोठे बहुमत या भाजपला मिळाले, तर लोक म्हणायला लागले की आता हे लखपती दीदी योजना बंद करणार. पण लक्षात ठेवा योजना बंद झालेली नाही आणि जोपर्यंत देवा भाऊ मुख्यमंत्री आहे तोपर्यंत योजना बंद होणार नाही. आता लाडक्या बहिणींना केवळ लाडक्या बहिणी ठेवायचे नाही, माझ्या लाडक्या बहिणींना लखपती दीदी बनवायचे आहे.

महाराष्ट्रात 50 लाख लखपती दीदी झाल्या

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्रात 50 लाख लखपती दीदी झाल्या. मेघना दीदींनी एक लाख लखपती दीदी या परभणीतून केल्या आहेत. आता या वर्षी आपण एक कोटीपर्यंत पोहोचणार आहोत. आपला महापौर जेव्हा या महापालिकेवर बसेल, त्याच्या बरोबर एक वर्षानंतर मी पाहायला येणार आहे आणि त्यावेळी मी केलेल्या कामांचा आढावा तर घेईलच, पहिला आढावा मी हा घेणार की तुम्ही माझ्या किती लाडक्या बहिणींना लखपती केले. या परभणीच्या विकासाच्या जो आड येईल, त्याला आई प्रभादेवीच्या आशीर्वादाने त्याच ठिकाणी आम्ही नेस्तनाबूत केल्याशिवाय आम्ही राहणार नाही, असा इशारा देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिला. ते म्हणाले, खऱ्या अर्थाने प्रभावतीच्या या नगरीत माझी आपल्या सगळ्यांना विनंती आहे की आता किती वर्ष आपण इतिहासात सांगणार आहोत? आता भविष्य तयार करण्याची वेळ आली आहे. इतिहासात जगणारे, इतिहासातच मारून जातात. इतिहास लक्षात ठेवायचा असतो, इतिहासाचा सन्मान करायचा असतो, पण भविष्याचा मार्ग हा आपल्याला कोरून काढायचा असतो.

# आंध्र प्रदेशात ONGC च्या तेल विहिरीतून वायू गळती

## स्फोटासोबत आगही लागली; तीन गावे रिकामी करण्यात आली

दिव्य वतन /वृत्तसेवा







सोमवारी आंध्र प्रदेशातील कोनसीमा जिल्ह्यातील राजोल भागात कार्यरत असलेल्या ओएनजीसी तेल विहिरीतून मोठ्या प्रमाणात गॅस गळती झाली. विहिरीवर दुरुस्तीचे काम सुरू असताना ही घटना घडली.

परिस्थिती लक्षात घेता, प्रशासनाने खबरदारी म्हणून इरुसुमांडा आणि जवळपासची तीन गावे रिकामी केली. अद्याप मृत्यू किंवा जखमी झाल्याचे कोणतेही वृत्त नाही.

वृत्तानुसार, तेल विहिरीतून उत्पादन तात्पुरते थांबवण्यात आले आणि दुरुस्तीचे काम सुरू होते. अचानक, एक मोठा स्फोट झाला आणि गॅस आणि कच्चे तेल वेगाने वरच्या दिशेने बाहेर पडू लागले. काही वेळातच, गॅसने पेट घेतला आणि विहिरीजवळ मोठ्या ज्वाळा उठू लागल्या.


प्रशासनाने लाऊडस्पीकरद्वारे लोकांना वीज बंद ठेवण्याचे, गॅसच्या चुली पेटवू नयेत आणि कोणत्याही इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा वापर करू नये असे आवाहन केले.

घटनेची माहिती मिळताच ओएनजीसीचे पथक घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी गॅस गळती आणि आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू केले. संपूर्ण परिसराला वेढा घालून सील करण्यात आले आहे. वरिष्ठ जिल्हा अधिकारी आणि ओएनजीसीचे अधिकारी घटनास्थळी उपस्थित आहेत आणि परिस्थितीवर सतत लक्ष ठेवून आहेत.ही ओएनजीसी विहीर डीप इंडस्ट्रीज लिमिटेडद्वारे चालवली जाते. २०२४ मध्ये ओएनजीसीच्या राजमुंद्री मालमत्तेमध्ये उत्पादन वाढवण्यासाठी कंपनीला अंदाजे ₹१,४०२ कोटी किमतीचा कंत्राट मिळाला होता.

दीप इंडस्ट्रीज लिमिटेड ही अहमदाबाद, गुजरात येथे स्थित एक कंपनी आहे. ती तेल आणि वायू क्षेत्रात कार्यरत आहे आणि जुन्या तेल आणि वायू विहिरींमधून उत्पादन वाढवणे, गॅस कॉम्प्रेशन आणि ड्रिलिंगशी संबंधित सेवा प्रदान करते. तिचे प्रमुख ग्राहक ओएनजीसी आणि ऑइल इंडिया आहेत. दीप इंडस्ट्रीज भारतात आणि परदेशात सेवा प्रदान करते.

# अमेरिकेचे उपराष्ट्रपती जेडी व्हेन्स यांच्या घरावर हल्ला:खिडक्यांच्या काचा फुटल्या

दिव्य वतन /वृत्तसेवा



अमेरिकेचे उपराष्ट्रपती जेडी व्हेन्स यांच्या ओहायो राज्यातील सिनसिनाटी येथील घरावर हल्ला झाला आहे. सीएनएनच्या वृत्तानुसार, त्यांच्या घराच्या खिडक्या फुटल्या आहेत. या प्रकरणी पोलिसांनी एका संशयिताला ताब्यात घेतले आहे.

व्हेन्स यांच्या घराशेजारी रविवारी रात्री १२:१५ वाजता एखाद्याला पळून जाताना पाहिले होते. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, ही घटना घडली त्यावेळी जेडी व्हॅन्स आणि त्यांचे कुटुंब घरी उपस्थित नव्हते. प्राथमिक माहितीनुसार हे देखील समोर आले आहे की, ताब्यात घेतलेला व्यक्ती उपराष्ट्रपतींच्या घरात घुसण्यात यशस्वी झाला नाही.

तपास यंत्रणा हे शोधण्याचा प्रयत्न करत आहेत की, ही घटना जाणूनबुजून जेडी व्हेन्स किंवा त्यांच्या कुटुंबाला लक्ष्य करून घडवण्यात आली होती की यामागे दुसरे काही कारण आहे.

या प्रकरणाबाबत व्हाईट हाऊस आणि सिक्रेट सर्व्हिसकडूनही माहिती मागवण्यात आली आहे, परंतु अद्याप त्यांच्याकडून कोणतेही अधिकृत निवेदन आलेले नाही.

व्हेन्स गेल्या आठवड्यापासून सिनसिनाटीत होते, पण रविवारी दुपारी ते शहराबाहेर पडले. त्यांनी सुमारे २.३ दशलक्ष एकर जागेवर वसलेल्या या घरावर सुमारे १.४ दशलक्ष डॉलर्स खर्च केले.

जेडी व्हेन्स यांचा जन्म २ ऑगस्ट १९८४ रोजी अमेरिकेतील ओहायो राज्यातील एका स्कॉटिश-आयरिश कुटुंबात झाला. जेडी हे त्यांची आई बेव्हरली एकिन्स आणि तिचा दुसरा पती डोनाल्ड बोमन यांचे पुत्र आहेत. जेडी यांचा जन्म झाला तेव्हा त्यांचे पालक आर्थिकदृष्ट्या अडचणीत होते. परिणामी, जेडींचे बालपण गरिबीत गेले.

जेडी काही महिन्यांचे असताना, त्यांच्या पालकांचा घटस्फोट झाला. दोन वर्षांनंतर बेव्हरलीने बॉब हॅमेलशी लग्न केले. दरम्यान, आर्थिक अडचणींमुळे जेडींची आई बेव्हरली ड्रग्ज आणि अल्कोहोलच्या आहारी गेली.

जेडीने त्यांचे बालपण त्यांचे आजोबा जेम्स व्हेन्स आणि त्यांची आजी बोनी व्हेन्स यांच्यासोबत घालवले. "हिलबिली एलेगी: अ मेमोयर ऑफ अ फॅमिली अँड कल्चर इन क्रायसिस" या त्यांच्या पुस्तकात जेडी लिहितात, "मला माझ्या आईचे वारंवार घर बदलणे आवडत नव्हते." मी माझ्या आजी-आजोबांच्या घरी राहिलो असतो.

# दिल्ली दंगल प्रकरणात उमर खालिद - शरजीलला जामीन नाही

दिव्य वतन /वृत्तसेवा



सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी दिल्ली दंगलीतील आरोपी उमर खालिद आणि शरजील इमाम यांना जामीन देण्यास नकार दिला. मात्र, इतर 5 आरोपींना 12 अटींसह जामीन मिळाला आहे. सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, उमर आणि शरजील या प्रकरणात एक वर्षापर्यंत जामीन अर्ज दाखल करू शकत नाहीत.

खरं तर, उमर खालिद, शरजील इमाम, गुलफिशा फातिमा, मीरान हैदर, शिफा उर रहमान, मोहम्मद सलीम खान आणि शादाब अहमद हे दिल्ली दंगलीच्या आरोपाखाली 5 वर्षे 3 महिन्यांपासून तिहार तुरुंगात बंद होते. त्यांनी दिल्ली उच्च न्यायालयाच्या त्या आदेशाला आव्हान दिले आहे, ज्यात 2020 च्या दिल्ली दंगलीशी संबंधित प्रकरणात त्यांना बेकायदेशीर कृत्ये (प्रतिबंध) अधिनियम (UAPA) अंतर्गत जामीन देण्यास नकार देण्यात आला होता.

सर्वोच्च न्यायालयाने म्हटले, 'अनुच्छेद 21 ला संवैधानिक व्यवस्थेत एक विशेष स्थान आहे. खटल्यापूर्वी तुरुंगवास ही शिक्षा मानली जाऊ शकत नाही. स्वातंत्र्यापासून वंचित ठेवणे मनमानी ठरणार नाही. UAPA हा एक विशेष कायदा म्हणून अशा अटींबद्दल कायदेशीर निर्णय दर्शवतो, ज्यांच्या आधारावर खटल्यापूर्वी जामीन दिला जाऊ शकतो.'

2 जानेवारी रोजी न्यूयॉर्कचे महापौर जोहरान ममदानी यांचे उमर खालिदला लिहिलेले पत्र समोर आले होते, ज्यावर बराच वाद झाला. ममदानी यांनी 1 जानेवारी रोजी शपथ घेतली होती. दुसऱ्या दिवशी त्यांचे पत्र सोशल मीडियावर समोर आले, ज्यात त्यांनी उमरसोबत

# आठवड्यापासून उमेदवाराचा 'एबी फॉर्म'च गायब!

## मात्र पोचपावती ठरली आधार, अखेर अजित पवारांच्या राष्ट्रवादीची उमेदवारी ग्राह्य

दिव्य वतन /वृत्तसेवा




पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीच्या उमेदवारी अर्ज छाननी प्रक्रियेत मोठा पेच निर्माण झाला होता, जिथे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या अधिकृत उमेदवार जयश्री भोंडवे यांचा 'एबी फॉर्म' अचानक गहाळ झाल्याने निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी त्यांना अपक्ष उमेदवार ठरवले होते. या निर्णयाविरोधात त्यांनी उच्च न्यायालयात धाव घेत सीसीटीव्ही आणि व्हिडिओग्राफी यांसारखे तांत्रिक पुरावे सादर केले. न्यायालयाच्या आदेशानंतर झालेल्या सखोल चौकशीअंती अखेर जयश्री भोंडवे यांची पक्षाची अधिकृत उमेदवारी ग्राह्य धरण्यात आली आणि त्यांना 'घड्याळ' हे निवडणूक चिन्हही बहाल करण्यात आले. मात्र आश्चर्याची बाब म्हणजे, ज्या अर्जामुळे हा संपूर्ण कायदेशीर लढा द्यावा लागला, तो त्यांचा मूळ 'एबी फॉर्म' अद्यापही सापडलेला नाही.

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या अधिकृत उमेदवार जयश्री भोंडवे यांचा 'एबी फॉर्म' गहाळ केल्याप्रकरणी निवडणूक निर्णय अधिकारी हनुमंत पाटील यांची तडकाफडकी बदली करण्यात आली आहे. अर्ज छाननीवेळी स्वतःच्या चुकीमुळे फॉर्म गहाळ झालेला असतानाही पाटील यांनी भोंडवे यांना अपक्ष उमेदवार ठरवले होते, ज्या विरोधात त्यांनी उच्च न्यायालयात धाव घेऊन सीसीटीव्ही आणि व्हिडिओग्राफीचे ठोस तांत्रिक पुरावे सादर केले. न्यायालयाच्या आदेशानंतर झालेल्या पुराव्यांच्या पडताळणीत भोंडवे यांचा दावा सत्य असल्याचे सिद्ध झाल्याने त्यांना पक्षाचे अधिकृत 'घड्याळ' चिन्ह बहाल करण्यात आले आहे, तर या संपूर्ण प्रकरणातील निष्काळजीपणामुळे संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यावर अखेर प्रशासकीय कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी एबी फॉर्म गहाळ प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत चिन्ह वाटपाच्या दिवशीच तातडीने सुनावणी घेतली, ज्यामध्ये उमेदवार जयश्री भोंडवे यांनी विहित मुदतीतच आपला एबी फॉर्म निवडणूक कार्यालयात सादर केल्याचे पुराव्यानिशी स्पष्ट झाले. आयुक्तांनी हा फॉर्म तांत्रिकदृष्ट्या ग्राह्य धरल्यामुळे, छाननी प्रक्रियेत 'अपक्ष' ठरलेल्या भोंडवे यांना अखेर

# बिनविरोध निवडी हा चांगला पायंडा:यामध्ये नियमांचे उल्लंघन होण्यासारखे काय आहे? चंद्रशेखर बावनकुळेंचा विरोधकांना सवाल

दिव्य वतन /वृत्तसेवा




बिनविरोध निवडीवरून राजकारण तापलेले असतानाच, निवडणूक बिनविरोध व्हायला काय हरकत आहे? हा एक चांगला पायंडा आहे. यामध्ये नियमाचे उल्लंघन होण्यासारखे काय आहे? असा प्रतिसवाल भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी केलाय. ते आज छत्रपती संभाजीनगर येथे पत्रकारांशी संवाद होते. यावेळी त्यांनी राज ठाकरे यांच्यावरही बोचरी टीका केली. राज ठाकरे यांच्या सभांना आता पूर्वीसारखी गर्दी होत नसेल, म्हणूनच ते आता मुंबईतील शिवसेना-मनसेच्या शाखांना भेटी देत फिरत आहेत," असे ते म्हणाले.

महानगरपालिका निवडणुकीत अनेक उमेदवार बिनविरोध निवडून आल्यानंतर विरोधकांकडून सत्ताधाऱ्यांवर आरोप सुरू आहेत. या बिनविरोध निवडीविरोधात मनसे नेते अविनाश जाधव यांनी आज राज्य निवडणूक आयुक्तांची देखील भेट घेत, त्यांच्यासमोर पुरावे सादर केलेत. यावर भाजपचे नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी विरोधकांचे आरोप फेटाळून लावत, बिनविरोध निवडींचे समर्थन केले.

मुंबई आणि ठाण्यातील अनेक जागांवर महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून आल्याच्या विरोधात मनसेने न्यायालयात धाव घेतली आहे. यावर बावनकुळे म्हणाले की, "निवडणूक बिनविरोध व्हायला काय हरकत आहे? हा एक चांगला पायंडा आहे. यापूर्वी राज्यात बिनविरोध सरपंच निवडून यायचे, तेव्हा आम्ही कधीच विरोध केला नाही. जनतेला विकास हवा आहे, म्हणून त्यांनी सत्ताधाऱ्यांच्या मागे उभे राहण्याचे ठरवले आहे." राज ठाकरेंनी या प्रकरणी न्यायालयात जाण्याची गरज नव्हती, असेही त्यांनी नमूद केले.



राज ठाकरे यांनी रविवारी शिवसेना भवनातून भाजपवर 'दुटप्पी' भूमिकेचा आरोप केला होता. पश्चिम बंगालमध्ये बिनविरोध निवडणुकांना विरोध करणारा भाजप महाराष्ट्रात त्याचे समर्थन कसे करतो, असा सवाल त्यांनी विचारला होता. याला उत्तर देताना बावनकुळे म्हणाले की, "ज्याला जिथे जायचे आहे तिथे जाण्याचा अधिकार लोकशाहीत आहे. बिनविरोध निवडीमध्ये कोणत्याही नियमाचे उल्लंघन झालेले नाही. मग यात आक्षेप घेण्यासारखे काय?".

प्रणिती शिंदेंच्या भाजप प्रवेशाच्या चर्चेवर पडदा

सोलापूरच्या नेत्या प्रणिती शिंदे भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याच्या चर्चांवर बावनकुळे यांनी स्पष्टीकरण दिले. "प्रणिती शिंदे कधीही भाजप नेत्यांच्या भेटीला आलेल्या नाहीत आणि त्या आमच्या संपर्कातही नाहीत. अफवा पसरवून उगाच एखाद्याचे राजकीय करिअर कशाला उद्ध्वस्त करता?" असे म्हणत त्यांनी या चर्चा फेटाळून लावल्या.

## आरोग्य....

### खवळलेले पित्त होईल क्षणात शांत, कधीच होणार नाही ॲसिडिटी...

मानवी आरोग्याचा केंद्रबिंदू आपली पचनसंस्था आहे, मात्र आधुनिक जीवनशैलीने या केंद्रालाच विस्कळीत केले आहे. एम्स आणि हार्वर्ड येथील तज्ज्ञ गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट डॉ. सौरभ सेठी यांच्या मते, पचनक्रिया सुधारण्यासाठी महागड्या औषधांपेक्षा निसर्गातील घटकांवर विश्वास ठेवणे अधिक फायदेशीर आहे. भारतीय परंपरेत हजारो वर्षांपासून वापरात असलेले हळद, आले, बडीशेप, जिरे आणि धणे यांसारखे मसाले केवळ अन्नाची चव वाढवत नाहीत, तर ते औषधी वनस्पती म्हणून कार्य करतात. या मसाल्यांमध्ये नैसर्गिक एंझाइम्स आणि अँटी-इन्फ्लेमेटरी गुणधर्म असतात, जे आतड्यांमधील सूज कमी करतात आणि चांगल्या जीवाणूंची संख्या वाढवण्यास मदत करतात. अनेकदा लोक पोटदुखी किंवा गॅससाठी तातडीने गोळ्या घेतात, परंतु या औषधांचे वारंवार सेवन केल्याने आतड्यांचे नैसर्गिक कार्य मंदावू शकते. याउलट, नैसर्गिक घटकांचा वापर केल्यास पचनसंस्था मुळापासून मजबूत होते आणि ॲसिडिटीसारखे त्रास कायमचे दूर होऊ शकतात. डॉ. सेठी यांनी सुचवलेले हे आठ मसाले आपल्या आरोग्याचे सुरक्षा कवच आहेत. जर आपण आपल्या दैनंदिन आहारात या मसाल्यांचा योग्य पद्धतीने समावेश केला, तर आपण कोणत्याही दुष्परिणामांशिवाय दीर्घकाळ तंदुरुस्त राहू शकतो. पोटाचे आरोग्य नीट असेल तर संपूर्ण शरीराची ऊर्जा टिकून राहते, म्हणूनच पचनासाठी नैसर्गिक मार्गांचा अवलंब करणे ही आजच्या काळाची सर्वात मोठी गरज आहे. हळदीमध्ये 'कर्क्युमिन' हा घटक असतो, जो आतड्यांमधील जळजळ कमी करून चांगल्या जीवाणूंचे पोषण करतो. दररोज रात्री हळदीचे दूध प्यायल्याने पचनसंस्था मजबूत होते आणि शरीराची प्रतिकारशक्ती वाढते. त्याचप्रमाणे, आले हे पोटातील अन्न पुढे सरकवण्याची प्रक्रिया वेगवान करते, ज्यामुळे गॅस आणि मळमळ यांसारख्या समस्या त्वरित दूर होतात. जेवणानंतर आल्याचे पाणी किंवा आल्याचा तुकडा चघळल्याने पचनक्रिया अधिक सुलभ आणि कार्यक्षम बनते.

### कॅन्सरची गाठ वेळीच रोखतात रोजच्या जेवणातील हे 7 पदार्थ, न चुकता ताटात ठेवा पोट व आतड्याच्या कॅन्सरमधून होईल सुटका



कॅन्सर म्हणजे शरीरातील पेशींची अनियंत्रित आणि अस्वाभाविक वाढ, जी निरोगी ऊतींना नष्ट करू शकते. मात्र, निसर्गाने आपल्याला अशा अनेक वनस्पती आणि अन्नपदार्थ दिले आहेत, ज्यात कर्करोगविरोधी गुणधर्म आढळतात. हे पदार्थ शरीरातील 'फ्री रॅडिकल्स' नष्ट करतात, जे पेशींच्या डीएनऊ (DNA) ला नुकसान पोहोचवण्यासाठी कारणीभूत असतात. आपल्या स्वयंपाकघरात सहज उपलब्ध असणारे हळद, लसूण, टोमॅटो आणि हिरव्या पालेभाज्या हे केवळ चव वाढवणारे घटक नसून ते आरोग्याचे सुरक्षा कवच आहेत. जेव्हा आपण हे पोषक घटक नियमितपणे घेतो, तेव्हा शरीराची स्वतःला दुरुस्त करण्याची क्षमता वाढते आणि ट्युमरसारख्या गाठींची वाढ होण्यास प्रतिबंध मिळतो. संशोधनानुसार, संतुलित आहार आणि नैसर्गिक घटकांचा वापर कॅन्सरचा धोका ३० ते ४० टक्क्यांपर्यंत कमी करू शकतो. निरोगी राहण्यासाठी महागड्या औषधांपेक्षा निसर्गाच्या जवळ जाणे आणि नैसर्गिक अन्नाचे महत्त्व समजून घेणे ही काळाची गरज आहे. योग्य आहारासोबतच नियमित व्यायाम आणि व्यसनांपासून दूर राहिल्यास आपण या जीवघेण्या आजारापासून स्वतःला सुरक्षित ठेवू शकतो. खालील पाच मुख्य घटक आपल्या आहारात समाविष्ट केल्यास कॅन्सरपासून बचाव करण्यास मोठी मदत होते. भारतीय स्वयंपाकघरातील हळद आणि लसूण हे कॅन्सर रोखण्यासाठी सर्वात प्रभावी मानले जातात. हळदीमध्ये 'करक्युमीन' नावाचा घटक असतो, जो अँटी-कॅन्सर घटक म्हणून ओळखला जातो आणि तो पेशींच्या दाह कमी करण्यास मदत करतो. तसेच, लसणामध्ये 'एलिसिन' असते, जे शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढून पचनसंस्थेचे आणि पोटाचे कॅन्सर होण्याचा धोका कमी करते. रोजच्या जेवणात हळदीचा वापर करणे किंवा रात्री कोमट दुधात हळद टाकून पिणे हे शरीरासाठी सुरक्षा कवच म्हणून काम करते, तर कच्च्या लसणाचे सेवन पेशींना संसर्गापासून वाचवते.

### थंडीतील भयंकर आजार व इनफेक्शनपासून रहाल 100 हात दूर, सुरू करा

हिवाळ्यातील थंडीचा प्रभाव केवळ बाह्य वातावरणावरच नाही, तर आपल्या शरीराच्या अंतर्गत कार्यावरही होतो. या काळात शरीरातील 'वात' आणि 'कफ' दोषांचे संतुलन बिघडण्याची शक्यता असते, ज्यामुळे सांधेदुखी, सर्दी, खोकला आणि पचनाच्या तक्रारी उद्भवतात. आयुष मंत्रालयाच्या गाईडलाईन्स आपल्याला निसर्गाशी सुसंगत जीवनशैली जगण्यास प्रवृत्त करतात, जेणेकरून आपण ऋतू बदलाच्या आजारांपासून स्वतःचे रक्षण करू शकू. या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, हिवाळ्यात आहार आणि विहार (दिनचर्या) यामध्ये जाणीवपूर्वक बदल करणे आवश्यक आहे. थंडीच्या दिवसात शरीराची पचनशक्ती (जठराग्नी) प्रबळ असते, म्हणूनच या काळात पौष्टिक आणि उबदार अन्नाचे सेवन करणे आरोग्यासाठी फायदेशीर ठरते. केवळ औषधे घेऊन आजार बरे करण्यापेक्षा, नैसर्गिक पद्धतींनी आपली प्रतिकारशक्ती कशी वाढवता येईल, यावर मंत्रालयाचा भर आहे. तेल मालिश, उबदार पाण्याचे सेवन आणि योगासने यांसारख्या साध्या उपायांमुळे आपण हिवाळ्यात होणारा थकवा आणि आजारपण टाळू शकतो. विशेष म्हणजे, या गाईडलाईन्समध्ये काय खावे यासोबतच काय टाळावे, यावरही सविस्तर प्रकाश टाकला आहे. या नियमांचे पालन केल्यास आपण केवळ आजारी पडण्यापासून वाचू शकत नाही, तर संपूर्ण ऋतूत स्वतःला ऊर्जावान आणि सक्रिय ठेवू शकतो. निरोगी राहण्यासाठी आयुष मंत्रालयाने सुचवलेली ही त्रिसूत्री - योग्य आहार, [illegible] आणि सक्रिय जीवनशैली—आजच्या काळात प्रत्येकासाठी अत्यंत महत्त्वाची आहे.

## नो लेडीज, नो मॅरेज' म्हणणाऱ्या कुरळे बंधूंच्या आयुष्यात कामिनीची एन्ट्री



ज्यांच्या आयुष्यात स्त्रियांना अजिबात स्थान नाही त्यांच्या आयुष्यात अचानक एका महिलेची एन्ट्री झाल्यानंतर काय गोंधळ निर्माण होईल? हे कथानक आपल्याला 2006 साली आलेल्या 'साडे माडे तीन' सिनेमात पाहायला मिळालं होतं. या चित्रपटातील कुरळे बंधू 20 वर्षांनी पुन्हा एकदा प्रेक्षकांचे मन जिंकण्यासाठी सज्ज झाले आहे.

या लोकप्रिय चित्रपटाचा सिक्वेल म्हणजेच 'पुन्हा एकदा साडे माडे तीन' हा सिनेमा 30 जानेवारी 2026 रोजी रीलिज होणार असून, नुकताच सिनेमाचा टीजर प्रदर्शित झाला. टीजरमध्ये पाहायला मिळतंय की, रतन, मदन, चंदन आणि बबन यांच्या आयुष्यात कामिनीची एन्ट्री झाली आहे. आतापर्यंत महिलांशी अजिबात न बोलणाऱ्या आणि तसे केल्यास दादाचा मार खावा लागणाऱ्या या कुरळे बंधूंच्या आयुष्यात कामिनीच्या येण्याने काय घडेल, हे पाहणे रंजक ठरेल.

कामिनीची भूमिका अभिनेत्री Rinku Rajguru साकारत असून, ती आता या कुरळे ब्रदर्सच्या गँगमध्ये सामील झाली आहे. शिस्तप्रिय भावंडांमध्ये बिनधास्त कामिनीची एंट्री होणं म्हणजे डबल गोंधळ आणि डबल विनोद! 'नो लेडीज, नो मॅरेज... कारण हे आहे कुरळे गॅरेज!' असा नियम असणाऱ्या कुरळे बंधूंच्या गॅरेजमध्ये ही कामिनी धुमाकूळ घालताना दिसेल. कठोर स्वभावाचा रतन, विनोदी मदन, निरागस स्वभाव असलेला चंदन या भिन्न स्वभावांच्या भावंडांसोबत, तसेच खट्याळ बबनसोबत तिची केमिस्ट्री कशी असेल, हे सिनेमा रीलिज झाल्यानंतरच स्पष्ट होईल.

रिंकूने या आगामी सिनेमाविषयी अशी प्रतिक्रिया दिली की, ''पुन्हा एकदा साडे माडे तीन'सारख्या मोठ्या आणि प्रेक्षकांच्या मनात स्थान असलेल्या चित्रपटाच्या सिक्वेलचा भाग होणं हे माझ्यासाठी खूप खास आहे. अशोक सराफ , भरत जाधव, मकरंद अनासपुरे आणि सिद्धार्थ जाधव यांच्यासारख्या दिग्गज कलाकारांसोबत तसेच चित्रपटाचे दिग्दर्शक अंकुश चौधरी यांच्यासोबत काम करताना खूप काही शिकायला मिळालं.'

## नंदिनीला जिंकण्यासाठी जीवाची फिल्मी स्टाइल!

### धुळीस मिळवला सासऱ्यांचा प्लॅन,..

Lagnanantar Hoilach Prem च्या 5 January 2026 च्या भागाच्या सुरुवातीला जीवा त्याच्या मनातील आवाज ओळखण्याचा प्रयत्न करत असतो. तो एकटाच काहीतरी बोलत असतो, तेव्हा नंदिनीची आई तिला समजावते की, जीवाला तिचा भास होत असल्याने तो स्वत:शीच बोलतो आहे. ती नंदिनीला आग्रह करते की, नंदिनीने जीवाला घरात घ्यावं, पण नंदिनी तसं न करण्यावर ठाम असते.

दुसरीकडे देशमुखांच्या घरी काव्या गेस्ट रुममध्ये राहायला लागते. मानिनी म्हणते की, काव्याने घरी आल्यानंतर पार्थने फारसा विरोध केला नाही, म्हणजे तिने येणं त्याला मान्य आहे. काव्या पार्थच्या प्रेमात इतकी बुडालेली असते की, गेस्ट रुममधूनच ती हे ओळखते की, पार्थ त्याच्या खोलीत आता काय करत असेल. काव्या या गोष्टीला 'दिव्यदृष्टी' म्हणते. ती जे जे म्हणते, तेच पार्थ करत असतो. तो काव्याच्या चित्राकडे पाहून बोलत राहतो. काव्या मानिनीला म्हणते की, 'बोका आणि मांजरीच्या प्रेमाची लढाई आता सुरू झाली आहे, मला पार्थ देशमुखांना जिंकायचं आहे.'

मानिनी-काव्या मिळून जीवाला व्हिडिओ कॉल करतात, तिथे तो मोहितेंच्या अंगणातच बसलेला असतो. तो आधी खोटं बोलतं की, नंदिनीची आई घरात खूप खाऊ घालते आणि म्हणून तो घराबाहेर बसला आहे. काव्या-मानिनी दोघींनाही समजतं की, तो खोटं बोलतोय. मग तो त्यांना धनंजयने घराबाहेर काढल्याचं सत्य सांगतो. मानिनी-काव्या जेव्हा त्याला मदतीचा हात पुढे करतात, तेव्हा जीवा म्हणतो की ही त्याची लढाई आहे आणि तो जेव्हा घरी परत येईल, तेव्हा तो नंदिनीला घेऊनच येईल.

तेव्हाच नेमकी नंदिनी तिथे येते, पण ती जीवाशी धड बोलतही नाही. त्याला तिथून निघून जायला सांगते आणि वैतागून आनंद निवासमध्ये जायला निघते. जीवादेखील आनंद निवासमध्ये येण्याचा आग्रह करतो, तो तिला बाइकने सोडेल असंही म्हणतो. तेव्हा नंदिनी रिक्षाने जाण्यासाठी आग्रही असते. जीवा शेवटी म्हणतो की, तो आनंद निवासमध्ये फोन करुन घडला प्रकार सर्वांना सांगेल. तेव्हा नंदिनी त्याला तंबी देते की, 'खबरदार! तुम्हाला घरात घेतलेलं नाही, याची जर रिक्षा तुम्ही फिरवली तर याद राखा.' म्हणजेच सर्वांना जाऊन त्याने घडला प्रकार सांगितला, तर गाठ तिच्याशी आहे, असं नंदिनी जीवाला सुनावते. नंदिनीने वारंवार केलेला रिक्षाचा उल्लेख ऐकून जीवाला एक कल्पना सुचते.

त्यानंतर मानिनी काव्याला सांगते की, पुढच्या काही दिवसात पार्थ तिच्याशी काही वाईट बोलला तर तिने वाईट वाटून घेऊ नये. काव्या म्हणते की, ती देशमुखांच्या प्रेमात पडली आहे आणि म्हणून तिला वाईट वाटणार नाही. 'लग्नासाठी कायपण' हे एकच मिशन ती फॉलो करणार आहे. तिच्याही डोक्यात एक संकल्पना असते. तेवढ्यात आशा मानिनीला येऊन सांगते की, जीवाच्या खोलीत साफसफाई करायला जातेय. जीवाने आधीच तिला सांगितलेलं असतं की, नंदिनी येईलपर्यंत त्या खोलीतील एकही वस्तू तिने इकडची तिकडे करू नये.



## 6 ला टक्कर देण्यासाठी झी मराठीचा हुकमी एक्का; 'टीआरपी क्वीन' येणार एकत्र



कलर्स मराठी वाहिनीवर 11 जानेवारी 2026 पासून बिग बॉस मराठीचे पुढील पर्व म्हणजेच, Bigg Boss Marathi 6 ची सुरुवात होणार आहे. 5 जानेवारी 2026 रोजी या कार्यक्रमाची पत्रकार परिषद पार पडली. ज्यामध्ये रितेश देशमुखने या शोविषयी पत्रकारांच्या विविध प्रश्नांची उत्तरे दिली. यंदाच्या पर्वात कोण झळकणार आणि नेहमीप्रमाणे बिग बॉस मराठीचे हे पर्वदेखील टीआरपीचे सर्व विक्रम मोडणार का, हेही लवकरच स्पष्ट होईल. यादरम्यान रितेशच्या या शोला टक्कर देण्यासाठी इतर वाहिन्यांनीही कंबर कसली आहे.

'बिग बॉस मराठी 6' पुढील रविवारपासून दररोज रात्री 8 वाजता प्रसारित होईल. 11 जानेवारीपासून पुढचे 100 दिवस या वेळेत हा कार्यक्रम पाहायला मिळेल. रात्री 8 वाजताच्या टाइम स्लॉटमध्ये बिग बॉसला टक्कर देण्यासाठी झी मराठीने एक दमदार निर्णय घेतला. झी मराठी वाहिनीवर या वेळेत दोन लोकप्रिय मालिकांचा महासंगम पाहायला मिळणार आहे. अलिकडेच याविषयी पोस्ट शेअर करण्यात आली.

झी मराठीवर 11 जानेवारीपासून रात्री 8 वाजता 'कमळी' आणि 'लक्ष्मी निवास' या मालिकांचा महासंगम पाहायला मिळणार आहे. हा भाग दीड तासांचा असेल. तसेच किती तारखेपर्यंत महासंगम स्पेशल एपिसोड दाखवले जातील, याविषयी अद्याप घोषणा करण्यात आलेली नाही. मात्र, हर्षदा खानविलकर, अक्षय देवधर, दिव्या पुगांवकर आणि विजया बाबर या टीआरपी क्वीन एकत्र आल्याने वाहिनीला फायदाच होणार आहे.

ईटाइम्सने सूत्रांच्या हवाल्याने दिलेल्या माहितीनुसार, 'चला हवा येऊ द्या' फेम अभिनेता-कॉमेडियन सागर कारंडे, मालिका विश्वातील लोकप्रिय अभिनेता संकेत पाठक, सोशल मीडिया इन्फ्लूएन्सर अनुश्री माने, मराठी सिनेइंडस्ट्रीतील लोकप्रिय चेहरा आणि राजकारणात सक्रीय असणारी दिपाली सय्यद, लावणी नृत्यांगना राधा मुंबईकर यंदा या खेळात सहभागी होणार आहेत. तसेच इतरही काही नावांची चर्चा आहे.

## लोकप्रिय गायिकेच्या बहिणीचा ओमानमध्ये ट्रेकिंगदरम्यान मृत्यू..

मुंबई - ओमानची राजधानी मस्कट येथे राहणाऱ्या एका भारतीय महिलेचा ट्रेकिंग अपघातात मृत्यू झाला आहे. मूळ केरळमधील थझवा येथील रहिवासी असलेली ५२ वर्षीय शारदा अय्यर ही दिवंगत कृषी शास्त्रज्ञ आरडी अय्यर आणि रोहिणी अय्यर यांची मुलगी होती. ती मल्याळम गायिका चित्रा अय्यर यांची बहिणी होती. गल्फ न्यूजच्या वृत्तानुसार, अधिकाऱ्यांनी सांगितलं की, ओमान एअरच्या एक्स मॅनेजर शारदा अय्यरचा २ जानेवारी रोजी अपघात झाला तेव्हा ती ओमानच्या अल दाखिलियाह गव्हर्नरेटमधील जेबेल शम्स प्रदेशात ट्रेकिंग करत होती. शारदाच्या मृत्युनं अय्यर कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. शारदाच्या बहिणीने चित्रा यांनीही सोशल मीडियावर त्यांच्या बहिणीसाठी भावूक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टवर नेटकऱ्यांनी गायिकेच्या बहिणीला श्रद्धांजली अर्पण केली आहे.

शारदाच्या मृत्यूचं नेमकं कारण अद्याप उघड झालेलं नाही, परंतु ज्या ठिकाणी अपघात झाला तो उंच कडा आणि मोठा भूभाग ट्रेकर्समध्ये धोकादायक मानला जातो. शारदाचं पार्थिव ओमानहून केरळला विमानाने घेऊन जात आहे आणि ७ जानेवारी रोजी कुटुंबाच्या थाझवा येथील वडिलोपार्जित घरी तिच्यावर अंत्यसंस्कार केले जातील.

वडिलांच्या अंत्यसंस्काराला उपस्थित राहण्यासाठी भारतात गेल्यानंतर २४ डिसेंबर रोजी शारदा ओमानला परतली, असं एनडीटीव्हीच्या रिपोर्टनुसार सांगितलं जात आहे. ११ डिसेंबर रोजी शारदाच्या वडिलांचं निधन झालं. गायिका चित्रा अय्यर यांनीही सोशल मीडियावर तिच्या बहिणीच्या निधनावर भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. चित्रा यांनी इन्स्टाग्रामवर पोस्ट शेअर करत लिहिलं की, 'चल, माझ्या लाडक्या बहिणी. तू खूप वेगाने धावतेस! पण मी लवकरच भेटेन... शेवटी... लवकरच, मी वचन देते.'



## 'माझे 3.5 लाख रुपये बाकी, TDS बद्दल तर...' शशांक केतकरनंतर मंदार देवस्थळींवर आणखी एका अभिनेत्याने व्यक्त केला संताप

अभिनेता Shashank Ketkar याने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत मंदार देवस्थळी या निर्माता-दिग्दर्शकावर तिखट शब्दात टीका केली आहे. 'सुखांच्या सरींनी... हे मन बावरे' मालिकेदरम्यानचे 5 लाख रुपये थकवल्याचा आरोप शशांकने केला. 5 जानेवारी 2026 रोजी एक लांबलचक पोस्ट, एक व्हिडिओ आणि मंदार यांच्यासोबतच्या संभाषणाचे काही स्क्रिनशॉट शेअर करत शशांकने त्याचा मुद्दा मांडला. याच पोस्टवर मालिकेतील अन्य एका कलाकाराने कमेंट केली. अभिनेता संग्राम समेळची ही कमेंट असून, त्यानेही मंदार यांच्यावर 3.5 लाख रुपये न दिल्याचा आरोप केला. शशांकच्या पोस्टवर अभिनेता संग्राम समेळ याने कमेंट करत असे लिहिले की, 'माझे अजूनही जवळपास 3.5 लाख रुपये बाकी आहेत. TDS बद्दल तर बोलायलाच नको. मागे आम्ही 5 वर्षांपूर्वी पोस्ट केली होती, तेव्हा दादाला पाठिंबा देणारे काही लोक अचानक उभे राहिले, 400-500 लोक... त्या सर्वांनी 500-500 रुपयांची वर्गणी काढली असती तरी आपले थोडेफार पैसे मिळाले असते.'

तुमचे सुद्धा पैसे मिळाले नाहीत का? अशा आशयाचा एक प्रश्न संग्रामच्या या कमेंटवर एका युजरने विचारला. त्यावर उत्तर देताना संग्रामने म्हटले की, 'त्या मालिकेतल्या जवळजवळ सगळ्यांचेच.' त्यावर शशांकने संग्रामला असा सल्ला दिला की, 'तूही शांत बसू नकोस... त्याच्याबद्दल मनात प्रचंड आदर आहे पण त्या आदराच काय लोणचं घालू?'

शशांकने शेअर केलेल्या लेटेस्ट पोस्टमध्ये काही स्क्रिनशॉट आहेत. त्याने मंदार यांच्यासोबतच्या WhatsApp वरील संभाषणाचे स्क्रिनशॉट शेअर केले आहेत. ज्यात शशांककडून पैशांसंदर्भात विचारणा केली जाते आहे, तर पैसे लवकरच दिले जातील असे आश्वासन दिले जाते आहे. शिवाय निर्मात्याने मेसेजमधून शशांकला वारंवार विनवणी केल्याचेही दिसते. शशांकने शेअर केलेले स्क्रिनशॉट ऑक्टोबर आणि नोव्हेंबर यादरम्यानचे आहेत.त्याने असेही कॅप्शन लिहिले की, 'मी लीगल ॲक्शन घेतोच आहे पण तूर्तास मंदार देवस्थळी (मंदार दादा) या उत्तम दिग्दर्शकाचा आणि हे मन बावरे या मालिकेच्या निर्मात्याचा थापा मारण्याचा Pattern तुमच्याही लक्षात यावा या साठी हा Video स्क्रिनशॉटसकट पोस्ट करतो आहे. पैशाचा विषय स्वतः कधीही काढत नाही अन् आम्ही विषय काढला की तो रडतो, गयावया करतो. डार्लिंग, बाळा वगैरे म्हणतो आणि आम्ही कलाकार मूर्ख ठरतो.'या पोस्टमध्ये त्याने 5 लाखांची रक्कम अद्याप मिळाली नसल्याचे म्हटले. शशांकने माहिती दिली की, त्याने मुद्दल वसूल करुन घेतले, मात्र कापलेला TDS बाकी आहे. 'TDS कापला आणि सरकारला भरला नाही असा दुहेरी गुन्हा केला', असा आरोपही शशांकने केला. शशांकने असेही म्हटले की, तो लवकरच कायदेशीर तपशीलासह आणखी एक व्हिडिओ शेअर करणार आहे.



## अर्थविश्व...

### कंपनीला परदेशातून मिळाली वर्क ऑर्डर, शेअरमध्ये मोठी तेजी, स्टॉकची किंमत 30 रुपयांपेक्षाही कमी



मुंबई: एका कंपनीच्या शेअरमध्ये आठवड्याच्या पहिल्याच दिवशी 20 टक्क्यांपर्यंत तेजी पाहायला मिळाली . मिनी डायमंड्स इंडिया लिमिटेडच्या शेअरमध्ये ही मोठी वाढ दिसून आली. याचे कारण हे कंपनीला परदेशातून मिळालेली वर्क ऑर्डर आहे. यामुळे शेअरची किंमत 26.55 रुपयांवर पोहचली आहे.कंपनीने माहिती दिली की, हाँगकाँगच्या एका क्लायंटकडून 16,65,00,000 रुपयांचा नवीन वर्क ऑर्डर मिळाल्याने ही तेजी आली आहे. कंपनीला लॅबमध्ये तयार केलेल्या हिऱ्यांचे काम मिळाले असून ते तीन महिन्यांत पूर्ण करावे लागणार आहे. या कामाचे पैसे सहा महिन्याच्या आत दिला जाणार

मिनी डायमंड्स इंडिया लिमिटेडचा शेअर BSE वर 25.65 रुपयांवर उघडला. दिवसा कंपनीच्या शेअरच्या भावात 20 टक्क्यांची वाढ होऊन तो 28.92 रुपयांच्या इंट्रा-डे उच्चांकावर पोहोचला. मात्र, त्यानंतर नफावसुलीमुळे मार्केट क्लोजिंगच्या वेळी हे शेअर 10.17 टक्क्यांच्या वाढीसह 26.55 रुपयांवर होते. कंपनीचा 52 आठवड्यांचा उच्चांक 43.60 रुपये आणि नीचांक 19.50 रुपये आहे. कंपनीचे मार्केट कॅप 312 कोटी रुपये आहे.

गेल्या एका महिन्यात कंपनीच्या शेअर्सच्या किमतीत 14 टक्क्यांची घसरण झाली आहे. याच काळात सेन्सेक्समध्ये 7.85 टक्क्यांची वाढ झाली. गेल्या दोन वर्षांत मिनी डायमंड्स इंडिया लिमिटेडच्या शेअर्समध्ये 639 टक्क्यांची वाढ झाली आहे. तर, 5 वर्षांत या पेनी स्टॉकने 52010 टक्के परतावा दिला आहे. 2025 मध्ये कंपनीने शेअरचे 5 तुकड्यांमध्ये विभाजन केले होते. गुंतवणूकदारांसाठी परवडणारी क्षमता वाढवण्यासाठी कंपनीने 10 रुपयांच्या दर्शनी मुल्याच्या शेअरचे पाच 2 रुपये दर्शनी मूल्याच्या शेअर्समध्ये विभाजन केले होते. गुंतवणूकदारांना त्यामुळे 1 एका शेअरवर 4 अधिक शेअर मिळाले होते.

### करदात्यांना पुन्हा दिलासा मिळणार, अर्थमंत्र्यांच्या पेटाऱ्यातून काय निघणार ? अर्थसंकल्पातून खेळणार मास्टरस्ट्रोक ?




गेल्या काही वर्षात सरकारने अर्थसंकल्पांतून अनेक कर सवलती दिल्या, तर रिझर्व बँकेने गेल्या एका वर्षात व्याजदरात अंदाजे 1% कपात केली ज्यामुळे सर्वसामान्यांना आवश्यक असा दिलासा मिळाला. याशिवाय गेल्या वर्षी सणासुदीच्या दिवसात जीएसटी 2.0 देखील लागू केला गेला, पण भांडवली बाजारात अपेक्षित असलेले मजबूत पुनरुज्जीवन दिसून आले नाही. अशा स्थितीत, बाजाराला चालना देण्यासाठी सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे ग्राहकांकडे पुरेशी रोख रक्कम असणे, आवश्यक असल्याचे तज्ञांचे म्हणणे आहे. देशात महागाईचा जोर कमी झाला आहे आणि 2025 नंतरची सर्वात कमी पातळीवर आली आहे, त्यामुळे उपभोगाबद्दल चिंता निर्माण होताना दिसत नाही.एकीकडे वाढ जास्त आहे, तर दुसरीकडे महागाई तुलनेने कमी असून परदेशी गुंतवणूक संस्था (FII) गेल्या काही काळापासून भारतीय बाजारापासून दुरावले जात आहेत, तर किरकोळ विक्रीचा सहभाग सातत्याने वाढत आहे. अशा स्थितीत, आगामी अर्थसंकल्पात सरकारने कोणती पावले उचलण्याची आवश्यकता आहे

सरकारने 2026 च्या अर्थसंकल्पाची तयारी आधीच सुरू केली आहे. अर्थ मंत्रालयाने प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष करांमध्ये बदल करण्याबाबत व्यापार आणि उद्योगांकडून सूचना मागवल्या आहेत. आतापर्यंत टॅक्स रेट सोपे करणे आणि नियम सुलभ करणे यावर लक्ष केंद्रित केले असून या दरम्यान, लाखो करदात्यांनाही सरकारकडून दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. जुन्या कर व्यवस्थेत करदात्यांना सध्याची 2.5 लाख रुपयांची मूलभूत सूट मर्यादा वाढवण्याची अपेक्षा करत आहेत. याशिवाय, नवीन व्यवस्थेप्रमाणेच सवलत देण्यासाठी कर स्लॅबमध्ये सुधारणा केली गेली पाहिजे. बचत, विमा आणि मुलांचा शिक्षण खर्च सुलभ करण्यासाठी 80C मर्यादा 1.5 लाख रुपयांवरून 2-3 लाख रुपयांपर्यंत वाढवण्याची मागणीही जोर धरू लागली असून आजही मोठ्या संख्येने नोकरदार लोक पीएफ, गृहकर्ज, मुलांचे शुल्क आणि विमा यासारख्या वाजवटींमुळे जुन्या कर व्यवस्था निवडत आहेत.

### Share Market मध्ये ही घसरगुंडी थांबणार की नाही? खटा-खट परतावा देणारा मल्टीबॅगर शेअर धडा-धड आपटला



आंतरराष्ट्रीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर भारतीय शेअर मार्केटमध्ये विक्रीचा जोर पाहायला मिळत असून गेल्या दोन ट्रेडिंग सत्रांमध्ये क्युपिड लिमिटेडच्या शेअर्समध्ये मोठी विक्री झाली आहे. देशांतर्गत बाजारात सोमवारी, आठवड्याच्या पहिल्या व्यापार दिवशी, शेअर बाजारात अस्थिरता असून या दरम्यान, स्मॉल-कॅप मल्टीबॅगर क्युपिड लिमिटेडच्या शेअर्सनी सलग दुसऱ्या दिवशी 20% लोअर सर्किट गाठले.गेल्या वर्षभरापासून शेअर बाजारात तेजीत असलेल्या क्युपिड लिमिटेड या मल्टीबॅगर स्टॉकच्या शेअर्समध्ये गेल्या दोन ट्रेडिंग सत्रांमध्ये लक्षणीय घसरण झाली

# बांगलादेशची IPL प्रसारणावर बंदी:मुस्तफिजुरला लीगबाहेर केल्याने निर्णय, टी-20 विश्वचषकासाठी संघही भारतात पाठवणार नाही

बांगलादेश सरकारने देशात आयपीएलच्या प्रसारणावर बंदी घातली आहे. तेथील माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने सोमवारी या संदर्भात निर्देश जारी केले. यात असे लिहिले होते की, बीसीसीआयने 26 मार्चपासून सुरू होणाऱ्या इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) मध्ये बांगलादेशी क्रिकेटपटू मुस्तफिजुर रहमानला कोलकाता नाइट रायडर्स संघातून वगळण्याचा निर्णय घेतला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, या निर्णयामागे कोणतेही ठोस किंवा तार्किक कारण नव्हते. हा निर्णय बांगलादेशच्या जनतेसाठी अपमानजनक, दुर्दैवी आणि निंदनीय आहे. अशा परिस्थितीत, पुढील निर्देश मिळेपर्यंत आयपीएलच्या सर्व सामन्यांचे प्रचार, प्रसारण आणि पुनर्प्रसारण थांबवण्याचे निर्देश दिले जातात.

एक दिवसापूर्वी, रविवार, 4 जानेवारी रोजी, बांगलादेश क्रिकेट बोर्डाने टी-20 विश्वचषक खेळण्यासाठी आपला संघ पाठवण्यास नकार दिला होता. इतकेच नाही, तर BCB ने ICC ला आपले सामने श्रीलंकेत आयोजित करण्याची विनंती केली होती. BCB ने या मीडिया रिलीजमध्ये माहिती दिली.

3 जानेवारी रोजी कोलकाता नाइट रायडर्स (KKR) ने मुस्तफिजुरला संघातून बाहेर काढले. बांगलादेशात अल्पसंख्याक हिंदूंवर होत असलेल्या हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर त्याला संघातून काढण्याची मागणी होत होती. यानंतर BCCI ने शाहरुख खानच्या IPL संघ KKR ला मुस्तफिजुर रहमानला हटवण्याचे आदेश दिले होते, त्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. बांगलादेशात गेल्या 16 दिवसांत 4 हिंदूंची हत्या करण्यात आली आहे.

टी-20 विश्वचषकात पाकिस्तानने आपले सामने आधीच श्रीलंकेत हलवले आहेत. भारत आणि पाकिस्तानमधील राजकीय वादामुळे दोन्ही संघ एकमेकांच्या देशात क्रिकेट खेळत नाहीत. भारताने गेल्या वर्षी चॅम्पियन्स ट्रॉफीचे सामने पाकिस्तानात खेळले नव्हते. आता पाकिस्तानही भारतात टी-20 विश्वचषकाचे सामने खेळणार नाही. इतकेच काय, भारत-पाकिस्तान सामनाही श्रीलंकेतील कोलंबो येथे खेळवला जाईल. जर बांगलादेशचे सामने श्रीलंकेत हलवले गेले, तर असे दुसऱ्या संघासोबत होईल, जो वादामुळे भारतात विश्वचषक खेळणार नाही.




## मोहम्मद शमीला निवडणूक आयोगाची नोटीस, सहा दिवसांत हजर राहावं लागणार

नवी दिल्ली : भारताचा वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीला आता भारतीय निवडणूक आयोगाने नोटीस बजावली आहे. या नोटीसीमध्ये आता मोहम्मद शमीला फक्त सहा दिवसांत हजर राहण्यास सांगण्यात आले आहे. हे प्रकरण नेमकं आहे तरी काय, हे आता समोर आलं आहे.

मोहम्मद शमीच्या अडचणीत वाढ होत असल्याचे दिसत आहे. मोहम्मद शमी हा विजय हझारे ट्रॉफी गाजवत आहे. पण तरीही त्याला गौतम गंभीर यांनी भारताच्या संघात स्थान दिले नाही. त्यामुळए मोहम्मद शमीचे करीअर संपल्याचे आता म्हटले जात आहे. कारण जर यावेळी संघात स्थान दिले नाही तर वनडे वर्ल्ड कपसाठी त्याचा विचार केला जाणार नसल्याचे स्पष्ट आहे. त्यामुळे त्याला भारताचा संघ जेव्हा जाहीर झाला तेव्हा मोठा धक्का बसला होता. तेव्हा शमीचे नाव जोरदार चर्चेत होते. आता पुन्हा एकदा मोहम्मद शमी हा चर्चेत आला आहे. पण आता त्याला भारताच्या निवडणूक आयोगाने थेट नोटीस पाठवली आहे.

मोहम्मद शमीला आता भारताच्या निवडणूक आयोगाने नोटीस पाठवली आहे आणि सहा दिवसांत हजर राहण्यासाठी बजावले आहे. गेल्या वर्षी १६ डिसेंबरला पश्चिम बंगालमध्ये सुरू झालेल्या मतदार यादीच्या विशेष सघन पुनरावृत्तीशी (SIR) संबंधित प्रकरणासंदर्भात सोमवारी (५ जानेवारी) ही नोटीस बजावण्यात आली. मोहम्मद शमी गेल्यावेळी नोंदणी अधिकाऱ्यांसमोर उपस्थित राहू शकला नव्हता. मोहम्मद शमी आणि त्याच्या भावाला सुरुवातीला दक्षिण कोलकात्याच्या जाधवपूर परिसरातील कार्टजू नगर शाळेत सहाय्यक निवडणूक नोंदणी अधिकारी (AERO) यांच्यासमोर हजर राहण्यास सांगण्यात आले होते, परंतु राजकोटमध्ये पश्चिम बंगालसाठी होणाऱ्या विजय हजारे ट्रॉफी सामन्यात व्यस्त असल्याने शमी उपस्थित राहू शकला नाही. आता त्यांना पुढच्या सहा दिवसांत म्हणजेच ११ जानेवारीला पुन्हा हजर राहण्यास सांगण्यात आले आहे. यावेळी काहीही करून मोहम्मद शमीला उपस्थित राहावे लागणार आहे, जर शमी यावेळी उपस्थित राहीला नाही तर त्याच्यार मोठी कारवाई केली जाऊ शकते.



# सेल्फीसाठी हात ओढला!

## रोहित शर्माची संयमाची भूमिका; खिडकी बंद करत पुढे गेला 'हिटमॅन'

मुंबई : माजी भारतीय कर्णधार आणि स्टार फलंदाज रोहित शर्मा याचा एक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये रोहित आपल्या कारमधून जात असताना दोन चाहते त्याला भेटण्यासाठी धाव घेतात. सुरुवातीला रोहितने नेहमीप्रमाणे हसत हात हलवून चाहत्यांचे अभिवादन स्वीकारले. मात्र त्याचवेळी एका चाहत्याने रोहितचा हात पकडत सेल्फीसाठी ओढण्याचा प्रयत्न केला. यानंतर दोन्ही चाहते रोहितसोबत फोटो काढण्यासाठी त्याचा हात ओढू लागल्याचे व्हिडिओमध्ये स्पष्टपणे दिसते. परिस्थिती लक्षात घेत रोहितने अत्यंत संयमाने चाहत्यांना समजावले. कोणताही वाद न घालता, शांतपणे कारची खिडकी वर करत तो पुढे निघून गेला. या घटनेनंतर सोशल मीडियावर रोहितच्या संयमशील वागणुकीचे कौतुक होत आहे, तर काहींनी चाहत्यांच्या वर्तनावर नाराजीही व्यक्त केली आहे. दरम्यान, रोहित शर्माने अलीकडेच टी-20 आणि कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. मात्र वनडे क्रिकेटमध्ये तो अद्याप सक्रिय असून, 11 जानेवारीपासून बडोद्यात न्यूझीलंडविरुद्ध सुरू होणाऱ्या एकदिवसीय मालिकेत तो भारतीय संघात खेळताना दिसणार




आहे. या मालिकेकडे क्रिकेट चाहत्यांचे विशेष लक्ष लागले आहे. घरगुती क्रिकेटमध्येही रोहित शर्मा सध्या उत्कृष्ट फॉर्ममध्ये आहे. विजय हजारे ट्रॉफीमध्ये मुंबईकडून खेळताना त्याने सिक्कीमविरुद्ध 155 धावांची शानदार खेळी साकारली होती. मात्र पुढील सामन्यात उत्तराखंडविरुद्ध त्याला खातेही उघडता आले नाही. असे असले तरी त्याचा अनुभव आणि दर्जा अजूनही कायम असल्याचे त्याच्या खेळातून दिसून येते. 2025 हे वर्ष रोहित शर्मासाठी ऐतिहासिक ठरले. या वर्षात त्याने अनेक मोठे विक्रम आपल्या नावावर केले. तो पहिल्यांदाच आयसीसी वनडे फलंदाज क्रमवारीत नंबर-1 स्थानी पोहोचला. याशिवाय त्याने 20 हजार आंतरराष्ट्रीय धावांचा टप्पा पार केला आणि भारताला तिसऱ्यांदा चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकवून दिली. वनडे क्रिकेटमध्ये सर्वाधिक षटकार मारण्याचा विक्रमही रोहितच्या नावावर आहे. नोव्हेंबर महिन्यात दक्षिण आफ्रिकेविरुद्ध रांची येथे झालेल्या वनडेमध्ये त्याने पाकिस्तानच्या शाहिद आफ्रिदीचा विक्रम मोडला. रोहितने आतापर्यंत 279 वनडे सामन्यांमध्ये तब्बल 355 षटकार ठोकले आहेत. आकडेवारीवर नजर टाकली तर 2025 मध्ये रोहितने 14 डावांमध्ये 650 धावा केल्या आहेत. त्याची सरासरी 50 इतकी असून स्ट्राइक रेट 100 पेक्षा अधिक आहे. या कालावधीत त्याच्या बॅटमधून दोन शतके आणि चार अर्धशतके निघाली असून, नाबाद 121 धावा ही त्याची सर्वोत्तम खेळी ठरली आहे. रोहित शर्मा हा वनडे क्रिकेटमध्ये तीन द्विशतके करणारा जगातील एकमेव फलंदाज आहे. त्याने आतापर्यंत 279 सामन्यांत 11,516 धावा केल्या असून, भारतीय क्रिकेटच्या इतिहासात त्याचे नाव सुवर्णाक्षरांनी कोरले गेले आहे.

# 10 चेंडूंत अर्धशतक, 310 स्ट्राइक रेट!

## वैभव सूर्यवंशीचा बेनोनित स्फोट; आफ्रिकन गोलंदाजांची पुरती धुलाई

बेनोनी : वैभव सूर्यवंशीचा जलवा पुन्हा एकदा सर्वांना पाहायला मिळाला. कारण वैभवने तुफानी फटकेबाजी करत तब्बल ३१० च्या स्ट्राइक रेटने फलंदाजी केली. दक्षिण आफ्रिकेच्या दुसऱ्या वनडे सामन्यात वैभवने धमाकेदार फटकेबाजी करत गोलंदाजांना आपल्यापुढो लोटांगण घालण्यास भाग पाडले. कारण वैभने यावेळी फक्त १० चेंडूंतच आपले अर्धशतक साजरे केले.

वैभव सूर्यवंशीच्या नेतृत्वाखाली भारताने पहिल्या वनडे सामन्यात दमदार विजय साकारला होता. पण या सामन्यात वैभवची बॅट मात्र तळपली नव्हती. कारण या सामन्यात त्याला फक्त ११ धावांवर समाधान मानावे लागले होते. पण या दुसऱ्या सामन्यात मात्र त्याने ही सर्व कसर भरून काढली आणि चाहत्यांना आनंदीत केले. कारण दुसऱ्या सामन्यात चाहत्यांना वैभव सूर्यवंशीची धमाकेदार फलंदाजी पाहायला मिळाली.

वैभव सूर्यवंशीने सुरुवातीपासूनच मोठे फटके मारायला सुरुवात केली. पहिल्या षटकापासून तो गोलंदाजांवर तुटून पडला होता. यापूर्वी वैभवने विजय हझारे ट्रॉफीमध्ये अशीच फलंदाजी केली होती. विजय हझारे ट्रॉफीमध्ये वैभवने फक्त ८४ चेंडूंच १९० धावांची वादळी खेळी साकारली होती, तशीच फलंदाजी वैभवची आज पाहायला मिळाली. कारव वैभव यावेळी दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजीवर जोरदार प्रहार करत होता. वैभवच्या या खेळीतील सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे, त्याने आपले अर्धशतक होईपर्यंत एकही चौकार मारला नव्हता. पण तरीही त्याने या सामन्यात अशी फलंदाजी केली ती, दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांची बोलतीच त्याने बंद केली. वैभवने या सामन्यांत षटकारांचा पाऊस पाडला. १० षटकारांच्या जोरावरच त्याने ६० धावांची वसूली केली आणि फक्त १९ चेंडूंतच आपले अर्धशतक साजरे केले आणि भारताच्या विजयाचा पाया रचल्याचे सर्वांना पाहायला मिळाले.

वैभव सूर्यवंशीला दक्षिण आफ्रिकेच्य दौऱ्यासाठी भारतीय संघाचे कर्णधारपद देण्यात आले आहे. वैभवच्या नैतृत्वाखाली भारताने पहिला वनडे सामना जिंकला आहे. आता दुसऱ्या सामन्यातही भारत विजय मिळवेल, अशी भारताच्या चाहत्यांना नक्कीच आशा असेल. त्यामुळे आता तिसऱ्या सामन्यात वैभव कशी फटकेबाजी करतो आणि भारत विजय मिळवतो की नाही, याची उत्सुकता सर्वांना असणार आहे.



# महासंग्राम




## महत्त्वाचे...

### मराठी, हिंदू, हिंदुत्व शब्द वगळले



मुंबई : शिवसेना उबाठा आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे जाहीर करण्यात आलेल्या संयुक्त जाहीरनाम्यावर शिवसेना शिंदे गटाने कडाडून टीका केली. 'या वचननाम्यात ४० टक्के इंग्रजी शब्दांचा वापर केला असून विशिष्ट समाजाला खूश करण्यासाठी वचननाम्यातून मराठी माणूस, हिंदु, हिंदुत्व, हिंदुहृदयसम्राट शब्द वगळले आहेत,' अशी टीका शिवसेनेचे माजी खासदार राहुल शेवाळे यांनी मुंबईत पत्रकार परिषदेत केली.मुंबईतील बाळासाहेब भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत शेवाळे यांनी ठाकरे बंधूवर कडाडून टीका केली. यावेळी पक्षाच्या प्रवक्त्या शीतल म्हात्रे आणि राजू वाघमारे उपस्थित होते. 'वचननाम्यावर बाळासाहेब ठाकरे यांचा फोटो आहे, पण त्यात आत्मा नाही. बाळासाहेबांचा आदर आणि सन्मान न करणारा उबाठा, मनसे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचा जाहीरनामा हा शिवसैनिकाला आणि मराठी माणसाला वेदना देणारा आहे,' असे शेवाळे म्हणाले. 'संपूर्ण वचननाम्यात 'हिंदुहृदयसम्राट' असा उल्लेख टाळून उबाठाने बाळासाहेबांचा जन्मशताब्दी वर्षातच अवमान केला आहे,' असे शेवाळे म्हणाले.

### महापालिका निवडणुकीत तब्बल 'इतक्या' महिला उमेदवार



मुंबई : यंदाच्या मुंबई महापालिका निवडणुकीत पुरुष उमेदवारांपेक्षा महिला उमेदवारांची संख्या जास्त आहे. आरक्षण बदल आणि ५० टक्क्यांपेक्षा जास्त वॉर्डांमध्ये महिला उमेदवारांना प्राधान्य देण्यात आल्यामुळे महापालिका निवडणुकीत ८७९ महिला उमेदवार उभ्या आहेत. त्याचवेळी पुरुष उमेदवारांची संख्या ८२१ आहे. त्यामुळे निवडणुकीनंतर मुंबई महापालिकेतही 'महिला राज'च असणार का, हे पाहण्यासारखे असेल. मुंबई महापालिकेची शेवटची निवडणूक सन २०१७मध्ये पार पडली होती. महापालिकेचा कार्यकाळ संपुष्टात आल्यानंतर गेली तीन ते साडेतीन वर्षे मुंबई महापालिकेची निवडणूकच झाली नाही. यंदा पूर्णपणे नव्याने काढण्यात आलेल्या आरक्षण पद्धतीचा मुंबई महापालिकेच्या २२७ प्रभागांतील अनेक दिग्गज नगरसेवकांना फटका बसला. नवीन प्रभाग आरक्षण सोडतीमुळे यंदाच्या निवडणुकीत एकाच वॉर्डमध्ये ५० टक्क्यांपेक्षा जास्त महिला उमेदवार देण्यात आले आहेत. त्यामुळे मुंबईतील २४ वॉर्डपैकी के पूर्व, एफ उत्तर, आर मध्य वॉर्ड, आर उत्तर वॉर्डसह काही वॉर्डांत 'महिला राज'च असल्याचे आरक्षण बदलामुळे निश्चित झाले. यावेळी एक हजार ७०० उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. तर, ४५३ महिला उमेदवारांनी निवडणुकीतून माघार घेतली. माघार घेणाऱ्या एकूण उमेदवारांमध्ये २२० पुरुष आणि २२३ महिला उमेदवार आहेत. निवडणुकीत उभे असलेल्या एकूण उमेदवारांपैकी ८७९ महिला उमेदवार रिंगणात आहेत. 'एम पूर्व' वॉर्ड असलेल्या चेंबूर, देवनार, मानखुर्द, गोवंडी या भागात ६८ महिला उमेदवार आहेत.

# शरद पवार यंदा खासदार बनू शकणार नाहीत

## असदुद्दीन ओवेसी यांनी सांगितले राज्यसभेचे गणित; आमदारांचे संख्याबळ नसल्याकडे बोट

दिव्य वतन /वृत्तसेवा



मुंबई-राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यावेळी राज्यसभेवर निवडून जाण्याची शक्यता नसल्याचा दावा एमआयएमचे अध्यक्ष असदुद्दीन ओवेसी यांनी केला आहे. शरद पवारांकडे राज्यसभेवर परतण्यासाठी आमदारांचे संख्याबळ नाही. त्यामुळे नजीकच्या भविष्यात एक मोठा तमाशा होईल, असे ते म्हणालेत. ओवेसी यांच्या या विधानामुळे राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकत्र येऊन शरद पवार राज्यसभेवर जाणार का? असा प्रश्न चर्चिला जात आहे.

महाराष्ट्रात सध्या मुंबईसह 29 महापालिका निवडणुकांचा फड रंगला आहे. या निवडणुकीला राजकीय नेत्यांच्या प्रचारसभांमुळे अधिकच रंग चढला आहे. एमआयएमचे अध्यक्ष असदुद्दीन ओवेसी यांचीही एक सभा झाली. त्यात त्यांनी शरद पवारांच्या राज्यसभा सदस्यत्वावर भाष्य करून भविष्यात राज्याच्या राजकारणात मोठ्या घडामोडी होणार असल्याचे संकेत दिले.

शरद पवार यांचा राज्यसभेचा कार्यकाळ मार्चमध्ये संपणार आहे. आता त्यांच्याकडे सत्ता कुठे आहे? त्यांच्या युतीकडे त्यांना राज्यसभेवर पाठवण्याएवढे खासदार कुठे आहेत? ते राज्यसभेवर कसे जाणार? हे त्यांना विचारले पाहिजे. त्यांना पुन्हा राज्यसभेवर जायचे असेल तर त्यांना आमदारांचे संख्याबळ लागेल ना? मग तुम्हाला कळेल. त्यासाठी जे काही होईल तो फक्त तमाशा होईल. यामुळे महापालिका निवडणुकांसह राज्यसभेच्या निवडणुकाही महत्त्वाच्या आहेत, असे असदुद्दीन ओवेसी म्हणाले.उल्लेखनीय बाब म्हणजे पुढील काही महिन्यांत राज्यसभेवरील अनेक नेत्यांचा कार्यकाळ संपुष्टात येणार आहे. यात केंद्र सरकारमधील मंत्री व विविध पक्षांमधील प्रमुख नेत्यांचाही समावेश आहे. हे मंत्री पुन्हा निवडून आले नाही तर त्यांचा कार्यकाळ पुन्हा सुरू ठेवणे कठीण होईल. विशेषतः इतर प्रमुख नेत्यांनाही अडचणींचा सामना करावा लागेल. ज्या प्रमुख नेत्यांचा कार्यकाळ संपत आहे, त्यात काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, माजी पंतप्रधान एच डी देवेगौडा, काँग्रेस नेते दिग्विजय सिंह, शरद पवार, केंद्रीय मंत्री हरदीपसिंग पुरी, बी एल वर्मा, जॉर्ज कुरियन यांचा समावेश आहे.राज्यसभेचे उपसभापती हरिवंश नारायण सिंह, प्रेमचंद गुप्ता, रामनाथ ठाकूर, उपेंद्र कुशवाह, प्रियंका चतुर्वेदी, रामदास आठवले, रामगोपाल यादव, नीरज शेखर, रा जी, शक्तीसिंह गोहिल, अभिषेक मनु सिंघवी, थंबी दुराई, तिरुची शिवा व सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश रंजन गोगोई यांचाही यात समावेश आहे.

# मुंबईत सत्ता कुणाची?:मराठी मतं ठाकरे बंधूंकडे, अमराठी भाजप-शिंदेंकडे; सर्व्हेने उडवली खळबळ

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई- संपूर्ण देशाचे लक्ष लागून राहिलेल्या मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराला आता अधिकृतपणे रंगत चढू लागली आहे. सोमवारपासून मुंबईत ठाकरे बंधू आणि महायुतीच्या प्रमुख नेत्यांच्या प्रचारसभा सुरू होत असून, राजकीय वातावरण तापू लागले आहे. यंदाची मुंबई महानगरपालिकेची निवडणूक ही केवळ स्थानिक स्वराज्य संस्थेची लढत न राहता, ती थेट राजकीय अस्तित्व आणि वर्चस्वाची चाचपणी ठरणार आहे. एकीकडे राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्यासाठी ही निवडणूक अस्तित्वाची लढाई मानली जात असताना, दुसरीकडे भाजपने कोणत्याही परिस्थितीत मुंबईत आपलाच महापौर बसवायचा, असा निर्धार केल्याचे स्पष्टपणे दिसून



येत आहे.

या निवडणुकीत ठाकरे बंधूंनी आपले संपूर्ण लक्ष मुंबईतील मराठी मतदारांवर केंद्रित केले आहे. मराठी अस्मिता, मुंबईवरील हक्क आणि स्थानिक प्रश्न हे त्यांच्या प्रचाराचे मुख्य मुद्दे असणार आहेत. गेल्या काही वर्षांत मुंबईतील लोकसंख्येचा आकृतिबंध बदलला असला, तरी मराठी मतदार अजूनही निर्णायक भूमिका बजावू शकतो, असा ठाकरे बंधूंचा विश्वास आहे. त्यामुळे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि मनसे यांची संभाव्य एकत्रित ताकद मराठी मतदारांमध्ये प्रभावी ठरू शकते, असा अंदाज राजकीय विश्लेषक व्यक्त करत आहेत.

दुसरीकडे, भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने या निवडणुकीसाठी वेगळीच आक्रमक रणनीती आखली आहे.

# भाजपमध्ये मुख्यमंत्र्यांविरोधात मोठा गट सक्रिय झालाय:भविष्यात मोठा स्फोट होणार...

दिव्य वतन /वृत्तसेवा



मुंबई-राज्यातील महापालिका निवडणुकांमध्ये महायुतीचे ६८ नगरसेवक बिनविरोध निवडून आल्याने विरोधकांनी रान उठवले आहे. या प्रक्रियेत पारदर्शकता नसल्याचा आरोप करत काँग्रेस नेते नाना पटोले यांनी थेट निवडणूक आयोगावर निशाणा साधला. "राज्याचे निवडणूक आयुक्त हे भाजपच्या कार्यकर्त्यासारखे वागत आहेत, हे लोकशाहीसाठी अत्यंत घातक आहे," अशा शब्दांत त्यांनी आपला संताप व्यक्त केला. तर, भाजपमध्ये मुख्यमंत्र्यांविरुद्ध गट सक्रीय झाला आहे, असे म्हणत त्यांनी सुधीर मुनगंटीवार यांच्या नाराजीवर भाष्य केले.

सुरुवातीला बिनविरोध निवडींची चौकशी करण्याचे आश्वासन देणाऱ्या आयोगाने आता 'यू-टर्न' घेतल्याची टीका नाना पटोले यांनी केली. ६८ ते ७० जागांवर ज्या पद्धतीने बिनविरोध निवडणुका झाल्या, त्यामागे सत्ताधाऱ्यांचा दबाव असल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच, उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी विधानसभा अध्यक्षांनी दबाव आणल्याच्या चर्चेवरून, "विधीमंडळाची परंपरा जपण्यासाठी भाजपने तातडीने विधानसभा अध्यक्षांना बदलावे," अशी मागणीही नाना पटोले यांनी केली.नाना पटोले यांनी भाजपमधील अंतर्गत वादावर मोठा गौप्यस्फोट केला आहे. "भाजपमध्ये सध्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विरोधात एक मोठा गट सक्रिय झाला आहे. सुधीर मुनगंटीवार यांच्या मनात काय चाललंय, हे मुख्यमंत्र्यांना चांगलंच ठाऊक आहे," असे पटोले म्हणाले. भाजपमध्ये भविष्यात मोठा राजकीय स्फोट होईल आणि या सत्तासंघर्षाचे वाईट परिणाम शेतकऱ्यांना भोगावे लागत आहेत, असा दावाही त्यांनी केला. कुणाला जर याचे वाईट परिणाम भोगावे लागत असतील तर ते शेतकऱ्यांना भोगावे लागत आहेत, असेही ते म्हणालेत.

खासदार नारायण राणे यांनी दिलेल्या राजकीय निवृत्तीच्या संकेतांचे नाना पटोले यांनी स्वागत केले. "ज्येष्ठ नेत्यांनी राणेंचा आदर्श घ्यायला हवा," असे म्हणत त्यांनी भाजपमधील इतर वरिष्ठ नेत्यांना नाव न घेता चिमटा काढला. दुसरीकडे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या '७० हजार कोटींचा भ्रष्टाचार केला तरी मी मोकळा आहे' या विधानाचा समाचार घेताना नाना पटोले म्हणाले की, "हे विधान सूचक असून सरकार भ्रष्टाचाराकडे डोळेझाक करत असल्याचे स्पष्ट होते".

राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या कर्जावरील स्टँप ड्युटी माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाला नाना पटोले यांनी 'निवडणूक स्टंट' संबोधले. "निवडणुकीच्या तोंडावर केलेली ही घोषणा आहे, ही कर्ज घेण्याची वेळ नाही, आधी घोषणा केली असती तर फायदा झाला असता," असे नाना पटोले म्हणालेत. भाजपला केवळ सत्तेचा माज असून ते हिंदू-मुस्लिम आणि मराठी-हिंदी वादात लोकांना गुंतवून ठेवत आहेत," अशी बोचरी टीकाही त्यांनी केली.

# नारायण राणेंची प्रकृती बिघडली:भाषणावेळी स्टेजवर आली भोवळ, समर्थकांमध्ये चिंतेचे वातावरण; कालच दिले राजकीय निवृत्तीचे संकेत

दिव्य वतन /वृत्तसेवा



मुंबई-भाजपचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री नारायण राणे यांना चिपळूण येथील कृषी महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी भाषण करताना स्टेजवरच अचानक भोवळ आल्याने खळबळ उडाली. त्यानंतर त्यांच्या सुरक्षरक्षकांनी त्यांना तात्काळ खुर्चीवर बसवले आणि पाणी दिले. या कार्यक्रमाला नारायण राणेंच्या पत्नी निलम राणेही उपस्थित होत्या.

चिपळूणमध्ये आयोजित 'कृषी व पशुधन प्रदर्शन २०२६' च्या उद्घाटन सोहळ्यात नारायण राणे भाषण करत होते. यावेळी त्यांच्या समवेत पत्नी नीलम राणे आणि भाजपचे अनेक दिग्गज नेते व्यासपीठावर उपस्थित होते. सभेला संबोधित करत असताना अचानक राणेंना अस्वस्थ वाटू लागले. भाषणाच्या अखेरच्या टप्प्यात त्यांचा आवाज अचानक बसला आणि त्यांना चक्कर आल्यासारखे जाणवू लागले. प्रकृती बिघडल्याचे लक्षात येताच त्यांनी आपले भाषण घाईघाईने आटोपते घेतले. डायककडून खुर्चीकडे जाताना नारायण राणे यांना भोवळ आली. यावेळी जवळच असलेल्या कार्यकर्त्यांनी आणि सुरक्षा रक्षकांनी त्यांना तातडीने आधार दिला.

सध्या चिपळूणसह संपूर्ण कोकण पट्ट्यात उष्णतेची लाट जाणवत असून तापमानाचा पारा वाढलेला आहे. कडक ऊन सहन न झाल्याने आणि उष्णतेच्या त्रासामुळे नारायण राणे यांना हा त्रास झाल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात आला आहे. प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांनी माध्यमांशी बोलण्यासही नकार दिला. थोडा वेळ विश्रांती घेतल्यानंतर ते तातडीने आपल्या पत्नीसह विश्रामगृहाकडे रवाना झाले. यावेळी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

अवघ्या एक दिवसापूर्वी सिंधुदुर्ग येथील जाहीर सत्कार समारंभात नारायण राणे यांनी राजकीय संन्यासाचे संकेत दिले होते. "वय झालंय, आता शरीर थकतंय. दोन्ही मुले आता राजकारणात पूर्णपणे सेट झाली आहेत. त्यामुळे इथून पुढे त्यांनी राजकारण पाहावे आणि मी कौटुंबिक बिझनेसकडे लक्ष द्यावे, असा विचार करत आहे," असे राणे म्हणाले होते.

नारायण राणे यांनी भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष जे.पी. नड्डा यांची भेट घेऊन त्यांना राजकारणातून मुक्त करण्याची विनंती देखील केली. राज्यसभा किंवा लोकसभा नको असून त्यांना आपला व्यवसाय करायचा असल्याचे नड्डा यांना स्पष्ट सांगितले. मात्र नड्डा यांनी त्यांची ही विनंती मान्य केली नाही. राणेजी, हम आपको छोडनेवाला नही है, असे म्हणत नड्डा यांनी राणेंना राजकारणात सक्रिय राहण्याची विनंती केली.

# बिनविरोध निवडीविरोधात MNS, काँग्रेस अखेर हायकोर्टात:HC च्या निगराणीखाली चौकशी करण्याची मागणी; EC च्या तटस्थतेवर बोट

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई-राज ठाकरे यांच्या नेतृत्वातील महाराष्ट्र नवनिर्माण सेना व काँग्रेसने अखेर महापालिका निवडणुकांत बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारांविरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. या याचिकेद्वारे या दोन्ही पक्षांनी राज्य निवडणूक आयोगाच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत या प्रकरणाची हायकोर्टाच्या निगराणीखाली चौकशी करण्याची मागणी केली आहे. विशेषतः ही चौकशी पूर्ण होईपर्यंत बिनविरोध निवडणुकीचे निकाल जाहीर न करण्याचे आदेश निवडणूक आयोगाला द्यावेत, असेही या पक्षांनी म्हटले आहे. या याचिकेवर हायकोर्ट कोणता निर्णय देते? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

राज्यात सध्या मुंबईसह 29 महापालिकांच्या निवडणुकांचा फड रंगला आहे. येत्या 15 तारखेला मतदान होणार असून, 16 तारखेला निकाल घोषित होणार आहे. पण राज्यात जवळपास 67 ठिकाणी सत्ताधारी महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून आल्यामुळे राजकारण तापले आहे. या पार्श्वभूमीवर मनसेचे नेते अविनाश जाधव व काँग्रेस नेते समीर गांधी यांनी सोमवारी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करून महापालिका निवडणुकीच्या प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. या याचिकेद्वारे राज्य निवडणूक आयोगाच्या तटस्थतेवरही सवाल उपस्थित करण्यात आला आहे.

हायकोर्टाच्या निगराणीखाली चौकशीची मागणी

महापालिका निवडणुकीत उमेदवारी मागे घेणाऱ्या उमेदवारांना पैसे देऊन प्रसंगी दबाव टाकून उमेदवारी मागे घेण्यास भाग पाडण्यात आले. लोकप्रतिनिधित्व कायद्यात



बिनविरोध निवडीची कोणतीही संकल्पना नाही. या कायद्यात निवडून आलेले लोकप्रतिनिधी असा स्पष्ट उल्लेख आहे. त्यामुळे बिनविरोध विजयी उमेदवारांना पडलेल्या मतांची किमान टक्केवारी निश्चित केली जावी, अशी मागणी या याचिकेद्वारे करण्यात आली आहे.राज्य निवडणूक आयोग राज्य सरकारच्या दबावाखाली आहे. त्यामुळे ज्या ठिकाणी उमेदवार बिनविरोध निवडून आलेत, त्या प्रकरणाची हायकोर्टाच्या निगराणीखाली चौकशी करण्यात यावी. तसेच ही चौकशी पूर्ण होईपर्यंत बिनविरोध निवडणुकीचे निकाल जाहीर न करण्याचे आदेश निवडणूक आयोगाला द्यावेत, अशी मागणीही या याचिकेत करण्यात आली आहे.

कल्याण डोंबिवली महापालिकेत महायुतीचे सर्वाधिक 22 उमेदवार बिनविरोध निवडून आलेत. यात भाजपच्या 15, तर शिवसेनेच्या 7 उमेदवारांचा समावेश आहे. जळगावमध्येही सत्ताधारी भाजप व शिवसेनेचे प्रत्येकी 6 असे एकूण 12 उमेदवार कोणत्याही निवडणुकीशिवाय निवडून आलेत. याशिवाय भिवंडीत भाजपचे 6, तर शिवसेनेचे 2 असे 8 उमेदवार बिनविरोध निवडून आलेत.

दुसरीकडे, ठाणे महापालिकेत शिवसेनेचे 7, पनवेलमध्ये भाजपचे 6, तर 1 अपक्ष असे 7 उमेदवार बिनविरोध विजयी झालेत. अहिल्यानगर येथे भाजपचे 3, तर राष्ट्रवादी काँग्रेसचे 2 उमेदवार बिनविरोधात आलेत. धुळ्यातही भाजपचे 4 उमेदवार बिनविरोध नगरसेवक म्हणून निवडून आलेत. तर पुणे व पिंपरी चिंचवडमध्ये भाजपचे प्रत्येकी 2 उमेदवार विजयी झालेत. मालेगावातही इस्लामिक पार्टीचा एक उमेदवार बिनविरोध विजयी झाला आहे.